RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२५३ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.११ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# कलम ३७० हटवण्याचा केंद्राचा निर्णय योग्य आणि घटनात्मकदृष्ट्या वैध

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

जम्मू काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारे कलम ३७० हटवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय कायदेशीरदृष्ट्या योग्य होता की अयोग्य होता , यावर आज सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निकाल सुनावला आहे. केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० हटवण्याचा घेतलेला निर्णय हा वैध आणि कायदेशीर होता, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने आज दिला आहे. कलम ३७० हटवण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात सुमारे २३ याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. यावर चाललेल्या प्रदीर्घ सुनावणीनंतर आज अखेर सर्वोच्च न्यायालयाने आपला निकाल दिला. कलम ३७० हटवण्याची प्रक्रिया कायदेशीररीत्या पूर्ण झाल्याचा निकाल देतानाच सर्वोच्च न्यायालयाने जम्मू काश्मीरमध्ये पुढील ३० सप्टेंबरपर्यंत निवडणुका घेण्यात याव्यात, तसेच जम्मू काश्मीरला लवकरात लवकर पूर्ण राज्याचा दर्जा देण्याबाबत विचार करावा, असे आदेश दिले.




कलम ३७० हटवण्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर निकाल देताना सरन्यायाधीश डी. वाय चंद्रचूड यांनी काही महत्त्वाची निरीक्षणंही नोंदवली. सरन्यायाधीश डी. वाय चंद्रचूड निकालाचं वाचन करताना सांगितलं की, जम्मू काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे. भारतामध्ये विलिन झाल्यानंतर त्याचं स्वतंत्र, सार्वभौम अस्तित्व उरलेलं नाही. त्यामुळे त्याच्यासाठी काही वेगळ्या विशेष तरतुदी कायम ठेवता येणार नाहीत. तसेच कलम ३७० ही तेव्हा करण्यात आलेली तात्पुरती व्यवस्था होती, असं अत्यंत महत्त्वाचं निरीक्षण सरन्यायाधीशांनी निकाल देताना व्यक्त केले.

सरन्यायाधीश पुढे म्हणाले की, केंद्र सरकारच्या प्रत्येक निर्णयाला आव्हान देता येणार नाही, त्यामुळे अराजकाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. राष्ट्रपतींना कलम ३७० रद्द करण्याचा अधिकार आहे. तसेच त्यांच्याकडे विधानसभा भंग करण्याचाही अधिकार आहे.

५ ऑगस्ट २०१९ मध्ये संसदेने जम्मू काश्मीरमधील कलम ३७० हटवलं होते. त्याचसोबत राज्यात विभागणी करत जम्मू काश्मीर आणि लडाख वेगळे केले होते. ही दोन्ही राज्ये केंद्रशासित बनवली होती. केंद्र सरकारच्या या निर्णयाविरोधात २३ याचिका आल्या होत्या. या सर्व याचिकांवरील सुनावणी पार पडली असून सुप्रीम कोर्टानं निकाल राखून ठेवला होता. तो निकाल सरन्यायाधीशांनी आज सुनावला. केंद्र सरकारनं जम्मू काश्मीरमधील कलम ३७० हटवणे वैध की अवैध यावर जवळपास ४ वर्ष ४ महिने आणि ६ दिवसांनी सुप्रीम कोर्टाने आज निकाल दिला. सुप्रीम कोर्टातील ५ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर या खटल्यावर सुनावणी झाली होती. त्यात सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्या. संजय किशन कौल, न्या. संजीव खन्ना, न्या. बी.आर गवई, न्या. सूर्यकांत यांचा समावेश आहे.

## जम्मू-काश्मीरमध्ये ३० सप्टेंबरपर्यंत निवडणुका घ्या; सर्वोच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला आदेश

केंद्रातील मोदी सरकारने संविधानातील अनुच्छेद ३७० हटवण्याचा घेतला निर्णय योग्यच असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने हा ऐतिहासिक निर्णय देताना जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचंही म्हटलं आहे. त्याकाळात युद्धाची परिस्थिती पाहून ३७० कलम तयार करण्यात आलं होतं. हे कलम तात्पुरतं ठेवण्यात आलं होतं. ते बदलता येऊ शकत होतं. हे कलम निरस्त करण्यासाठी केंद्र सरकारने योग्य प्रक्रियेनुसार निर्णय घेतला आहे. जम्मू-काश्मीर भारताचं अभिन्न अंग आहे. भारताच्या अनुच्छेद १ पासून ते ३७० पर्यंत स्पष्ट आहे, असं कोर्टाने म्हणतानाच जम्मू काश्मीरमध्ये लवकरात लवकर निवडणुका घेण्याचे आणि जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

जम्मू-काश्मीरमधील निवडणुका अधिक लांबवू नका. ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुका घ्या, असे आदेशच सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्याचबरोबर जम्मू-काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा देण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. राज्याचा दर्जा देण्यात विलंब करू नका, असेही कोर्टाने म्हटलं आहे.

## तिसऱ्या दिवशीही विरोधक आक्रमक

### कांद्याला चार हजार रुपये भाव द्या - विरोधी पक्षनेते अंबादास दानवे

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

केंद्र सरकारने कांद्यावर निर्यातबंदी लावण्यापूर्वी कांद्याचा भाव प्रति क्विंटल ४००० ते ४२०० रुपये होतो. निर्यातबंदीनंतर कांद्याचा दर कमी होऊन १२०० ते १५०० रुपयांवर आला आहे. कांदा उत्पादन शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी राज्य सरकारने केंद्राच्या निर्यातबंदीचा विरोध करावा. अन्यथा राज्य सरकारने कांद्याला चार हजार रुपये भाव द्यावा, अशी मागणी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सोमवारी केली.



राज्यात कांदा निर्यातबंदीचा मुद्दा गाजत आहे. कांदा उत्पादक शेतकरी हतबल झाला आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने सोमवारी विधानभवन परिसरात आंदोलन केले. याप्रसंगी, 'कांद्याचा वांदा करणाऱ्या सरकारकचा धिक्कार असो', 'कांद्याची निर्यातबंदी हटवलीच पाहिजे', 'या सरकारचे करायचे काय, खाली डोके वरती पाय', 'कांद्याला भाव मिळालाच पाहिजे', 'हल्लाबोल हल्लाबोल, मोदी सरकारवर हल्लाबोल,' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. आंदोलनात विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री अनिल देशमुख, भास्कर जाधव, बंटी पाटील, विश्वजीत कदम, सचिन अहिर, प्रणिती शिंदे, रवींद्र धंगेकर, ऋतुराज गायकवाड, वर्षा गायकवाड पाटील आदींचा सहभाग होता.

## सप्टेंबरपर्यंत पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घ्यावा; उद्धव ठाकरेंचं मोदींना आवाहन

**दि.११विदर्भ प्रजसत्ताक नागपूर**

जम्मू काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारे कलम ३७० हटवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय कायदेशीरदृष्ट्या योग्य होता की अयोग्य होता, यावर आज सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निकाल सुनावला आहे. केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० हटवण्याचा घेतलेला निर्णय हा वैध आणि कायदेशीर होता, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. दुसरीकडे महाराष्ट्र विधानसभेचं हिवाळी अधिवेशन सुरू असून माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेही अधिवेनात पोहोचले आहे. त्यावेळी, पत्रकारांशी बोलताना त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचं स्वागत केलं. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदींना सवालही केला आहे. तसेच, पाकव्याप्त काश्मीरही सप्टेंबरपर्यंत आपण घेऊ शकलो, तर एकत्रितपणे निवडणूक घेता येईल, देशवासीयांना त्याचा आनंद होईल, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले.



सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे उद्धव ठाकरेंनी स्वागत केले. तसेच, देशात सध्या गॅरंटी देण्याचं काम सुरूय, सगळ्या गोष्टींची गॅरंटी दिली जात आहे. मग, कलम ३७० हटवल्याच्या निर्णयाचे शिवसेनेनं यापूर्वीही स्वागत केलं होतं. आता सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचेही आम्ही स्वागत करतो. मात्र, न्यायालयाने म्हटल्याप्रमाणे सप्टेंबरपर्यंत जम्मू-काश्मीरमधील निवडणुका घ्याव्यात, त्यापूर्वी पाकव्याप्त काश्मीरही आपल्या ताब्यात घ्यावा आणि एकत्रितपणे सर्व निवडणुका घ्यावात. म्हणजे, देशवासीयांना आनंद होईल, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले. तसेच, आता काश्मीरमधून दूर गेलेले काश्मिरी पंडित, पुन्हा काश्मीरमध्ये येऊन राहतील का?, असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला. तसेच, देशभरात विखुरलेले ते काश्मिरी पंडित परत येतील का, आणि निवडणुकीत मतदान करतील का, मोकळ्या वातावरणात जम्मू-काश्मीरच्या विधानसभेसाठी मतदान करतील काय, याची गॅरंटी पंतप्रधान नरेंद्र मोदी देतील का?, असा सवालही उद्धव ठाकरेंनी विचारला आहे.

## सरकारच्या समन्वयाचा अभावामुळेच शाळाबाह्य मुलांचा प्रश्न गंभीर

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्यामध्ये विशेषत: विदर्भामध्ये शाळाबाह्य मुलांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. तसेच स्थलांतरित मुलांच्या प्रश्नानेही गंभीर रूप धारण केले आहे. मात्र, याला राज्य सरकारच्या विविध खात्यांमधील समन्वयाचा अभाव कारणीभूत असल्याचा आरोप करीत काँग्रेसच्या आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी सरकारला विधानसभेत चांगलेच धारेवर धरले. राज्यातील शाळाबाह्य मुलांच्या आणि स्थलांतरित मुलांच्या प्रश्नाने गंभीर रूप धारण केले आहे. शेकडो विद्यार्थी हे वीटभट्ट्यांवर काम करताना दिसत आहेत, तर कित्येक विद्यार्थी भीक मागताना दिसत आहेत मात्र त्याचे या सरकारला अजिबात गांभीर्य नाही.



शाळाबाह्य मुलांच्या या निर्माण झालेल्या प्रश्नाला राज्य सरकारच्या नगर विकास विभाग, महिला बालविकास विभाग आणि शालेय शिक्षण या तीन विभागांमध्ये समन्वय नसल्यामुळेच ही परिस्थिती ओढवल्याचा गंभीर आरोप एडवोकेट ठाकूर यांनी आज विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे उपस्थित केला. तसेच विदर्भातील मेळघाटातील स्थलांतरित विद्यार्थ्यांसाठी एक विशेष प आपण महिला आणि बालविकास मंत्री असताना तयार केले होते. या पचे पुढे काय झाले? या पचा वापर सरकार का करत नाही. स्थलांतरित मुलांसाठी विशेष तयार करण्यात आलेले हे प सरकार केव्हा कार्यान्वित करणार आहे असा सवाल यावेळी ठाकूर यांनी उपस्थित केला.

## लग्नाचे वय झाले आता वडिलांना सोबत घेऊन फिरायचे नसते; नितेश राणेंची आदित्य ठाकरेंवर टीका

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

३२ वर्षांच्या युवकाला हे सरकार घाबरत असल्याचा दावा आदित्य ठाकरे करतात. मग, त्यांनी हिंमत असले एकटे यावे. त्यांचे लग्नाचे वय झाले असून आता त्यांनी वडिलांना सोबत घेऊन फिरू नये, असा टोला आमदार नितेश राणी यांनी सोमवारी विधानभवन परिसरात पत्रकारांशी बोलताना लगावला.

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यात आमदार नितेश राणे यांचे उपराजधानीत आगमन झाले. याप्रसंगी त्यांनी मराठा आरक्षण, संजय राऊत, आदित्य ठाकरे, रोहित पवार, लव्ह जिहाद आदी मुद्द्यांवर भाष्य केले. संजय राऊत यांच्यावर झालेल्या चप्पल हल्ल्यावर बोलताना ते म्हणाले,'घाण चपलांनीच साफ करायची असते. घाणीला हात लावायचो नसतो. त्यामुळे आमच्या कार्यकर्त्यांनी जे केले त्याचा अभिमान आहे.' लव्ह जिहाद प्रकरणात जिहादी वृत्तीचे नेते आमच्या हिंदू भगिनींना धमकावत आहेत. त्यामुळे लव्ह जिहादची प्रकरणे पुढे येत नाहीत. माझ्याकडे या संदर्भात पुरावे असल्याचेही त्यांनी सांगितले.



**रोहित पवार राजकारणातला ओरी**

रोहित पवार हा महाराष्ट्राच्या राजकारणातील ओरी आहे. तो माहिती नाही कशाला यात्रा घेऊन निघाला आहे. ओरीला आपण किती गांभीर्याने घ्यायचे, हा प्रश्न आहे. उबाठाला संपविण्यासाठी आदित्य ठाकरे, संजय राऊत पुरेसे आहेत. तसेच शरद पवार गटाला संपविण्यासाठी राजकारणातील हा ओरी सक्षम आहे, असे आमदार नितेश राणे म्हणाले.

## रस्त्यावर आल्याशिवाय दिल्लीला कळत नाही, कांदा प्रश्नावरून पवारांचा सरकारवर हल्लाबोल

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नाशिक**

नाशिक : केंद्र सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली असल्याने, कांद्याचे दर घसरले आहेत. यामुळे राज्यभरात शेतकऱ्यांमध्ये संताप पाहायला मिळत असून, कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रसचे अध्यक्ष शरद पवार मैदानात उतरले आहेत. आज पवारांच्या उपस्थितीत नाशिकच्या चांदवडमध्ये रास्तारोको आणि सभा होत आहे. याच सभेतून पवारांनी सरकारवर निशाणा साधला आहे. सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाला किंमत मिळत नसून, कांदा निर्यात बंदी करून शेतकऱ्यांची चेष्टा करण्यात येत असल्याचे पवारांनी म्हटले आहे. तसेच, कांदा निर्यात बंदी करून शेतकऱ्यांची चेष्टा करण्यात येत आहे. त्यामुळे कांदा निर्यात बंदी उठलीच पाहिजे. आम्हाला रस्त्यावर येण्याची हौस नाही, पण, रस्त्यावर आल्याशिवाय दिल्लीला कळत नाही, असेही शरद पवार म्हणाले. यावेळी बोलतांना पवार म्हणाले की, तुम्ही सगळे कष्ट करतायत, पण सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाला किंमत मिळत नाही.



## रिद्धपुरात मराठी भाषा विद्यापीठ उभारणीला वेग; जून २०२४ पासून प्रारंभाचे नियोजन

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

रिद्धपूर येथे उभारण्यात येत असलेल्या मराठी भाषा विद्यापीठासाठी जमिनीचे अधिग्रहण करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून उपविभागीय अधिकाऱ्यांना भूसंपादनाच्या संदर्भातील अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. मराठी भाषा विद्यापीठासाठी जागा अधिग्रहण करण्याबाबत नियम व अटी तपासून उपविभागीय अधिकारी यांनी तातडीने अहवाल सादर करावा आणि भूसंपादनाच्या बाबतीत शेतकऱ्यांना अवगत करावे, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तसेच अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथील वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था (मॉरिस कॉलेज) येथे गुरुवारी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विभागीय उपायुक्त गजेंद्र बावणे, रिद्धपूर येथील महंत कारंजेकर बाबा, महंत वाईनदेशकर, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे उपसचिव अजित बाविस्कर, सहसचिव प्रताप लुबाळ, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, सहसंचालक प्रकाश बच्छाव, डॉ. उमेश काकडे, संतोष चव्हाण, प्रशासन अधिकारी डॉ. प्रभू दवणे संबंधित अधिकारी उपस्थित होते. रिद्धपूर येथील महानुभाव गोविंदप्रभू तीर्थस्थान सेवा समितीच्या जागेत जून २०२४ पासून मराठी भाषा विद्यापीठ सुरू करण्याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.



गेल्या महिन्यात मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेसाठी गठित समितीने चंद्रकांत पाटील यांच्या दालनात मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेबाबतचा अहवाल सादर केला होता. हा अहवाल मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येईल. या मसुदा समितीचे रूपांतर विद्यापीठाच्या सल्लागार समितीत करावे. मराठी भाषा विद्यापीठाच्या स्थापनेसाठी समितीचे यापुढेही सहकार्य राहील. रिद्धपूर येथे लीळाचरित्र लिहिण्याबरोबरच मराठी भाषेतील ग्रंथ निर्मितीचे केंद्रही राहिले आहे. विद्यापीठाच्या माध्यमातून मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन होईल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

## रोहित पवारांची संघर्ष यात्रा नव्हे तर बालमित्र घेऊन निघालेले मंडळ : अमोल मिटकरी

**दि.११विदर्भ प्रजसत्ताक नागपूर**

वेगळे काहीतरी करायचे आणि त्यातून प्रसिद्धी मिळवायची या हेतूपलिकडे रोहित पवारांच्या संघर्ष यात्रेत काही नाही.आयुष्यात ज्या व्यक्तिला कधी संघर्ष करण्याचं काम पडलं नाही. तुम्ही संघर्ष यात्रा म्हणू नका हे बालमित्र घेऊन निघालेले मंडळ आहे त्यामुळे लोकांच्या नजरेत या यात्रेला कवडीची किंमत नाही अशा शब्दात अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी आमदार रोहित पवारांवर टीका केली आहे. अमोल मिटकरी म्हणाले की, संघर्ष यात्रेत सगळे बालकच आहेत. त्यांना आता अजितदादा व्हायचंय त्यामुळे बालमंडळाची फौज घेऊन ते चाललेत. बालमित्र संघटनेचे अध्यक्ष रोहित पवार आहेत.रोहित पवारांनी कुठला संघर्ष केलाय, कशासाठी यात्रा काढताय? रोहित पवारांच्या यात्रेत राष्ट्रवादीचे झेंडे नसतात असंही त्यांनी म्हटलं.



त्याचसोबत रोहित पवारांना गांभीर्याने घेऊ नका. रोहित पवारांना एकीकडे अजितदादांचे भाजपासोबत जाणे पसंत नाही. मग त्यांनी दिलेला निधी कसा चालतो हे रोहित पवार आणि त्यांच्या बालमित्र मंडळाला विचारले पाहिजे असा टोला मिटकरींनी लगावला आहे.

## संपादकीय ......

# कांद्याचा वांदा!

*आधीच आसमानी संकटाने बेजार झालेला कांदा उत्पादक शेतकरी आता कांदा निर्यात बंदीच्या निर्णयामुळे हतबल झाला आहे. केंद्र सरकारने स्थानिक बाजारपेठांतील कांद्याचे दर नियंत्रणात आणण्यासाठी पुन्हा निर्यात बंदीचे हत्यार बाहेर काढले. त्यासाठी लाल कांदा बाजारात येण्याची वाटदेखील बघण्यात आली नाही. केंद्राच्या निर्णयामुळे कांद्याच्या दरात ९०० ते हजार रुपयांची घसरण झाली आहे. त्यामुळे राज्यभरातील कांदा उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहेत. सरकारच्या निर्णयाला विरोध करत शुक्रवारी राज्यातील बहुतांश बाजार समित्यांमध्ये कांद्याचे लिलाव झालेच नाहीत. केंद्र शासनाने लाल कांदा येण्याची वाट न बघता कांदा निर्यात बंदीचा निर्णय घेतल्यामुळे शेतकर्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.*

*खरेतर अलीकडेच अवकाळी पाऊस व गारपिटीत नवीन लाल कांद्याचे मोठे नुकसान झाले. जवळपास १२ हजार हेक्टरवरील कांदा खराब झाला. त्यामुळे उत्पादनात घट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे नवीन लाल कांदा बाजारात येत असतानाही दरात फारशी घसरण झाली नाही. उलट पुढील काळात ते आणखी वाढण्याची शक्यता होती. म्हणजेच नुकसानीच्या काळात सरकार पाठीशी उभे राहिलेच नाही, पण जेव्हा दोन पैसे कमावण्याची वेळ आली तेव्हा मात्र निर्यात बंदी लादून थोड्याफार नफ्यावरही पाणी फिरवले. आता पुढच्या महिन्यात नवीन कांदा येण्यास सुरुवात होईल आणि आताच भाव पडल्यामुळे या नव्या कांद्याला भाव मिळण्याची शक्यता नाही. म्हणजे नुकसान हे आता पाचवीला पुजले गेले आहे. त्यामुळे आता काय करायचे, असा प्रश्न शेतकर्यांना पडला आहे.*

*कांदा निर्यात बंदीमागे पाच राज्यांतील निवडणुकांनाही जबाबदार धरले जाते. केंद्र सरकारने राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड आणि मिझोराम राज्यांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून कांद्यावर ८०० डॉलर निर्यात मूल्य केले होते. तसेच केंद्र सरकारच्या वतीने नाफेड, एनसीसीएफमार्फत खरेदी केलेल्या कांद्याच्या बफर स्टॉकमधून २ लाख टन कांदा २५ रुपये किलोने विक्री केला. या निर्णयामुळे तीन राज्यांमध्ये आपली सरकारे आल्याचा गैरसमज भाजपचा झाला आहे. यामुळे आता लोकसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून पुन्हा एकदा कांदा शेतकर्यांच्या आशा-अपेक्षांवर पाणी फिरवण्याचा उद्योग सरकारने केला आहे. अर्थात कांद्याच्या बाबतीतील भारतीय जनता पक्षाच्या गाठीशी असलेला अनुभव कटू आहे.*

*या पक्षाला १९९८च्या निवडणुकीमध्ये कांद्याचे दर भडकल्याने काही राज्यांत सत्ता गमवावी लागली होती. तेव्हापासून भाजपने कांद्याची धास्ती घेतली असावी. सत्तेत आल्यानंतर २०१४ मध्ये मोदींनी कांद्याचा अत्यावश्यक वस्तूंच्या यादीमध्ये समावेश केला, मात्र शेतकरीविरोधी निर्णय घेतले तरी त्याचा निवडणुकीमध्ये फटका बसत नसल्याचा भाजपचा अलीकडील काळातील अनुभव आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य ग्राहकांना खूश करण्यासाठी शेतकर्यांचा बळी दिला जात असल्याचे दिसते.*

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या माध्यमातून डाकघराचे पुनर्निर्माण

## खासदार डॉ.अनिल बोंडे यांचे प्रतिपादन, 'भारतीय टपाल' कायद्यावर विचार केले व्यक्त

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** १८९८ मध्ये केलेल्या भारतीय टपाल कायद्यात महत्त्वाचे बदल करून गुलामगिरीची मानसिकता समूळ उखडून टाकण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून 'इंडियन पोस्ट ॲक्ट' २०२३ आणून पोस्ट ऑफिसची पुनर्बांधणी केली जात आहे, ही देशासाठी अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे. असे मत खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी व्यक्त केले. दिल्लीत संसदेचे अधिवेशन सुरू आहे. डॉ.अनिल बोंडे यांनी केंद्र सरकारने आणलेल्या पोस्ट ऑफिस ऍक्ट २०२३ बाबत आपले मनोगत व्यक्त केले. पोस्ट ऑफिस गरीब लोकांसाठी, गावातील, शेतकरी, विद्यार्थी, महिलांसाठी खूप महत्वाचे आहे. मात्र २००४ ते २०१४ या कालावधीत ६०० टपाल कार्यालये बंद करण्याची प्रक्रिया सुरू झाली. आणि २०१४ ते २०२३ पर्यंत ५००० नवीन टपाल कार्यालये सुरू होणार आहेत. म्हणजेच पोस्ट ऑफिसच्या पुनर्बांधणीचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून झाले आहे. या आर्थिक वर्षात मंत्री अश्वनी वैष्णव यांच्या माध्यमातून आणखी ५७४६ टपाल कार्यालये उघडली जात आहेत. आता ५७४६ गरीब मुला-मुलींना आणि पूर्वीच्या ५००० लोकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. पोस्ट ऑफिसचे काम केवळ पत्रे आणि पार्सल पाठवणे एवढेच नाही. पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून १०० पेक्षा अधिक विविध सुविधा उपलब्ध करुण दिल्या जात आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यात आर्थिक सुविधेची देखिल भर पडली आहे.मातृशक्ती, महिलांना स्वावलंबी बनविण्याची हमी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली असून 'बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानांतर्गत पंतप्रधानांनी सुकन्या समृद्धी योजना आणून महिलांना दिलासा दिला आहे. असेही डॉ.अनिल बोंडे म्हणाले.



**पंतप्रधानांसोबत 'नारी शक्ती'**- तीन राज्यांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या विजयात महिला शक्तीचा मोठा वाटा आहे. संपूर्ण भारतातील स्त्री शक्तीची विश्वास हा फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आहे. अबला समजल्या जाणाऱ्या प्रत्येक महिलेला स्वावलंबी बनविण्याचे काम पंतप्रधानांनी केले असल्याचेही डॉ.अनिल बोंडे म्हणाले.

**जेवडगरात स्मार्ट डाकघर-** खा डॉ.अनिल बोंडे यांनी अमरावती येथे सुरू झालेल्या स्मार्ट जेवड नगर येथील पोस्ट ऑफिसचे सुद्धा उदाहरण संसदेत दिले. ते म्हणाले पूर्वी पोस्ट ऑफिसमध्ये निराशा जनक चित्र असायचे. मात्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, पोस्ट खात्याचे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पोस्टाचा चेहरा-मोहरा बदलण्यात महत्त्वपूर्ण भूमिका घेतली आहे. त्यामुळे अतिशय चांगल्या दर्जाचे पोस्ट ऑफिस अमरावतीत सुरू झाले आहे. भविष्यात यामध्ये आणखीनही वेगवेगळ्या प्रकारचे नवे बदल होतील, त्यासाठी सरकार पूर्णपणे प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# विद्यापीठाच्या योगासन चमूचे घवघवीत यश

## दोन्ही संघ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** नुकत्याच अण्णा विद्यापीठ, चेन्नई येथे संपन्न झालेल्या दक्षिण पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे पुरुष आणि महिला संघ सहभागी झाले होते. अतिशय चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत आपल्या उत्तम प्रदर्शनाच्या आधारे दोन्ही संघांनी प्रतिस्पर्धी संघाला मात देत पात्रता फेरी गाठली. महिला संघाने ५ वें स्थान तर पुरुषांच्या संघाने ११ वे स्थान प्राप्त केले. या संघाला मार्गदर्शक म्हणून डॉ. नितीन काळे, डी.सी.पी.ई. अमरावती, भाग्यश्री कानडे, अमरावती तर व्यवस्थापक म्हणून डॉ. वसिष्ठ खोडस्कर नेहरू महाविद्यालय, नेर परसोपंत यांनी उत्कृष्ट सेवा दिल्यात. दोन्ही संघाने प्राप्त केलेल्या या घवघवीत यशाबद्दल कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, प्र कुलगुरू डॉ. प्रसाद वडेगावकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, क्रीडा संचालक डॉ. अविनाश असनारे आणि क्रीडा मंडळाच्या सर्व सदस्यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्यात.




## शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित

# विदर्भस्तरीय शिवदौड मॅरेथॉन स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्यावतीने आयोजित विदर्भस्तरीय मॅरेथॉन शिवदौड स्पर्धेत आज सुमारे दीड हजार स्पर्धकांनी सहभाग घेतला. अमरावतीसह नागपूर, अकोला, भंडारा, यवतमाळ आदी विदर्भातील विविध जिल्ह्यातील महिला व पुरुष स्पर्धकांनी या स्पर्धेतील पारितोषिके पटकावली.अवघा साडेतीन वर्षाचा श्रीअंश फाटे,७६ वर्षाचे आनंद पुंडलिकराव हिवराळे आणि विशेष स्पर्धेत सहभागी झालेले दिव्यांग स्पर्धक व आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत भारताचे नाव उंचावणारे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तुषार शेळके या शिवदौडचे आकर्षण ठरले.श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांच्या अध्यक्षतेत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते या स्पर्धेचा शुभारंभ झाला. माजी मंत्री आमदार श्रीमती यशोमती ठाकूर, आमदार सौ.सुलभाताई खोडके, माजी महापौर विलास इंगोले, श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य प्रा.सुभाष बनसोड, स्वीकृत सदस्य नरेशचंद्र पाटील, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.रवींद्र कडू,



डॉ.प्रवीण रघुवंशी, भैय्यासाहेब मेटकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विक्रम साळी, सहाय्यक महसूल आयुक्त वैशाली पाथरे, विद्यापीठ शिक्षकेतर महाराष्ट्र कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अजय देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे, प्राचार्य दिलीप हांडे,प्रोव्हेन ई.पी.सी.या सोलर कंपनीचे प्रतिनिधी जयसिंगराव देशमुख, माजी प्राचार्य डॉ.रमेश अंधारे शुभारंभ व पारितोषिक वितरण समारंभाला प्रामुख्याने उपस्थित होते.शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या शिवाजी नगर येथील पूर्णाकृती पुतळ्यापासून महाविद्यालयाच्या खेळाडूंनी मशाल प्रज्वलित करून आणली व आंतरराष्ट्रीय खेळाडू तुषार शेळके यांनी ती पाहुण्यांच्या स्वाधीन केल्यावर त्यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. आयोजन समितीचे प्रमुख व महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे यांनी स्वागतपर तर संयोजक डॉ.सुभाष गावंडे यांनी प्रास्ताविक केले.डॉ.किशोर साबळे, डॉ.उमेश कडू, डॉ.अर्चना बोबडे, डॉ.सुजाता सबाने, डॉ.नितीन चांगोले, डॉ.कुमार बोबडे, डॉ.जी.जी.भारती, डॉ.मनोज जगताप, डॉ.ज्ञानेश्वर नामुर्ते, डॉ.कुलदीप मोहाडीकर, डॉ.संगीता भुयार, अमरावती जिल्हा ॲथलेटिक्स असोशिएशन चे सचिव प्रा.डॉ.अतुल पाटील, प्राचार्य डॉ.अंजली ठाकरे आदींनी पाहुण्यांचे स्वागत केले. शुभारंभ कार्यक्रम व पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे संचालन डॉ.राजेश मिरगे व डॉ.मनोज जोशी यांनी केले.

सर्व महिला व पुरुषांसाठी एकंदर आठ गटात झालेल्या या स्पर्धेला श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथून १० डिसेंबरला सकाळी ६.३० वाजता सुरुवात झाली.१० किलोमीटर पुरुष गटात राजन यादव,नागपूर यांनी प्रथम तर प्रशिक थेटे,अमरावती यांनी द्वितीय तर रीतेक पंचबुद्धेभंडारा यांनी तिसरा क्रमांक पटकावला.अजित भेंडे नागपूर, सुमी फुसाटे वर्धा, संजय पटेल अमरावती यांनी अनुक्रमे चवथे,पाचवे व सहावे स्थान पटकावले.५ किलोमीटर महिला गटात सलोनी लव्हाळे यांनी प्रथम तर अंजली मडावी, भारती बोरकर, वैष्णवी मेमंकर, अनिता परतेकी, प्रीती कापसे यांनी अनुक्रमे दुसरे,तिसरे,चवथे,पाचवे व सहावे स्थान पटकावले.१९ वर्षाखालील ५ किलोमीटर मुलांच्या गटात प्रतिक डांगे, भावेश खंडार, अवेश चव्हाण, प्रणय माहुले, योगेश पदुले, समित टोंग यांनी अनुक्रमे प्रथम ते सहावे स्थान पटकावले, ५ किलोमीटर १९ वर्षाखालील मुलींच्या गटात चैताली बोरेकर, आश्लेषा झोलेकर, राधा नागतोडे, मानसी काथोटे, जनव्ही रोझोडे, हिमांशी बावणे यांनी अनुक्रमे प्रथम ते सहावे स्थान मिळविले.१४ वर्षाखालील मुलांच्या गटात इशांत नंदनवार, ओम वाडेकर, कपिल आहाटकर, कार्तिक राठोड, सम्यक जरडे, सार्थक कोडपे यांनी अनुक्रमे प्रथम ते सहावे स्थान पटकावले, ४५ वर्षावरील ५ किलोमीटरच्या पुरुष गटात प्रमोद उरकुडे, घनश्याम मदनगीरवार, सुभाष निर्मल, शिवाजी गायकवाड, नागोराव भोयर, अशोक सोनोने यांनी अनुक्रमे प्रथम ते सहावे स्थान मिळविले.४५ वर्षावरील ३ किलोमीटर महिला गटात शारदा नागोराव भोयर, कविता राजवाडे, अर्चना मांगे, शिल्पा भारदे, जयश्री वानखडे, सोनाली तायडे यांनी अनुक्रमे प्रथम ते सहावे स्थान पटकावले.१४ वर्षाखालील ३ किलोमीटर मुलींच्या गटात कु.हिमांशी, श्रावणी खोब्रागडे, यशस्वी राठोड, मानवा पाबळे, अस्मिता सोनोने,ऐश्वर्या परसखेरडे यांनी अनुक्रमे प्रथम ते सहावा क्रमांक पटकावला. प्रत्येक गटात सहा याप्रमाणे एकूण दीड लक्ष रुपयांची एकूण ४८ बक्षिसे विजेत्यांना देण्यात आली. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना टी शर्ट, प्रमाणपत्र व मेडल्स देण्यात आले. प्रोव्हन ई.पी.सी.या सोलर कंपनी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघ व शासकीय कंत्राटदार वृषभ देशमुख यांनी ही स्पर्धा प्रायोजित केली.या स्पर्धेसाठी पुरस्कार देणाऱ्या दानदात्यांचा यावेळी पाहुण्यांच्या हस्थे सत्कार करण्यात आला.




# हाडांना भरपूर कॅल्शियम देतात ४ पदार्थ-रोज खा

## हाडांच्या बळकटीसाठी रामदेव बाबांचा खास सल्ला

दि. ११ विदर्भ प्रजासत्ताक शरीरातील हाडांना पुरेपूर कॅल्शियम मिळण्यासाठी आहारात पोषक घटकांचा समावेश करणं गरजेचं असतं. तुमचं शरीर हाडांवर टिकून आहे. जर हाडं कमकुवत झाली असतील तर शरीराच्या ओव्हरऑल कार्य पद्धतीवर परिणाम होतो. हाडं निरोगी आणि मजबूत राहण्यास मदत होते. जर तुम्ही हाडांकडे वेळेच लक्ष दिले नाही तर आर्थरायटिस सारखे गंभीर आजार होऊ शकतात. यामुळे हाडं कमकुवत होऊ लागतात. ही लक्षणं जाणवल्याने फ्रॅक्चर होणं, नखं कमकुवत होणं, पाठदुखी अशा समस्या उद्भवतात.

हाडांच्या चांगल्या आरोग्यासाठी कॅल्शियम फार महत्वाचे असते. रोज खाल्लया जाणाऱ्या खाद्यपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात कॅल्शियम असते यासाठी काय खायचं काय टाळायचं हे माहीत असावे लागते. योग गुरू बाबा रामदेव यांनी हाडांना मजबूत बनवण्यासाठी काही घरगुती उपाय सुचवले आहेत.

२) दूधात कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते. एक कप गाईच्या दूधात जवळपास ३०६ ते ३२५ मिलीग्राम कॅल्शियम असते. डेअरी उत्पादनांमध्ये कॅल्शियम मोठ्या प्रमाणात असते. याव्यतिरिक्त प्रोटीन, व्हिटामीन ए, व्हिटामीन डी चा चांगला स्त्रोत आहे.

**हाडं कमकुवत होण्याची लक्षणं**

कमकुवत हाडं ताण-तणावाचे कारण ठरतात. ज्यामुळे काम करण्यात अडचण येते. हाडांमध्ये फ्रॅक्चर झाल्यास जखम बरी होण्यास जास्त वेळ लागतो. रात्रीच्यावेळी हाडांमध्ये



वेदना जाणवतात. कमकुवत हाडं आणि सांधेदुखी जाणवते, सतत थकवा येतो.

**आहारात कॅल्शियम वाढवा**

१) प्रोटीन आणि आयर्नची शरीराला जास्त आवश्यकता असते. कॅल्शियम हाडं, दातांच्या विकासासाठी आवश्यक असते. यासाठी दूध, दही, पनीर, तीळ, बदाम, ब्रोकोली, बीन्स, संत्री, राजमा, टोफू यांसारख्या पदार्थांचा आहारात समावेश करा.

दूधात कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते. एक कप गाईच्या दूधात जवळपास ३०६ ते ३२५ मिलीग्राम कॅल्शियम असते. डेअरी उत्पादनांमध्ये कॅल्शियम मोठ्या प्रमाणात असते. याव्यतिरिक्त प्रोटीन, व्हिटामीन ए, व्हिटामीन डी चा चांगला स्त्रोत आहे.

सफरचंदाचे व्हिनेगर कॅल्शियमचा एक उत्तम स्त्रोत आहे. युएसडीएच्या रिपोर्टनुसार १०० ग्राम सफरचंदात जवळपास ७ मिलीग्राम कॅल्शियम असते. कॅल्शियमव्यतिरिक्त मॅग्नेशियम बायकार्बोनेट, सल्फेट्स यांसारखे मिनरल्स असतात.

रामदेव बाब सांगतात की हाडांना मजबूत ठेवण्यासाठी तुम्ही कोमट पाण्यात दालचिनी आणि मध घालून पिऊ शकता. दालचिनी आणि मधाचे सेवन केल्यास कॅल्शियम वाढण्यास मदत होते.

# आता गावोगावी पोहोचले आपला दवाखाना... शनिवारी उपक्रमाचा झाला शुभारंभ

## केंद्रीय मंत्री गडकरी, उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते 'दवाखाना आपल्या दारी' उपक्रमाचा शुभारंभ

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नागपूर -** जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीतून 'दवाखाना आपल्या दारी' या उपक्रमाचा शुभारंभ शनिवारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ परिसरात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

ग्रामीण भागातील जनतेपर्यंत आरोग्य वाहिनी व फिरत्या वैद्यकीय चमुच्या सहाय्याने सर्वसमावेशक आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. उद्घाटनप्रसंगी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, आ. आशीष जयस्वाल, सुभाष देशमुख, प्रवीण दटके, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अजय डवले यांच्यासह जिल्हा आरोग्य यंत्रणेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व राष्ट्रीय कार्यक्रमांची एकत्रितपणे अंमलबजावणी एका छताखाली या उपक्रमाद्वारे करण्यात येणार आहे.

आवश्यक औषधी व साधनसामुग्री तसेच आरोग्य चमूसह 'आरोग्यवाहिनी' सुसज्ज असणार आहे. एएनएम, डाटा एन्ट्री ऑपरेटर, आरोग्य सहाय्यक यासह डॉक्टरांची चमू आरोग्यवाहिनीत उपस्थित असणार आहेत. आरोग्य चमूचा दैनंदिन कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. प्रत्येक गावात शिबिराच्या एक दिवस आधी विविध माध्यमांसह दवंडी देऊन जनतेला माहिती देण्यात येणार आहे.

या पथकामार्फत आरोग्य सेवांसोबतच आयुष्मान भारत कार्ड, आभा कार्ड, प्रधानमंत्री मातृत्व अनुदान योजनेची नोंदणी करण्यात येईल. आवश्यक रक्त चाचण्या तसेच रुग्णांना पुढील सेवेसाठी संदर्भित करण्यात येणार आहे.



# शेतमालाच्या दरवाढीसाठी शेतकऱ्यांचे लक्ष अधिवेशनाकडे

## हिवाळी अधिवेशनाकडून शेतकऱ्यांना दरवाढीची अपेक्षा

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** देशातला शेतकरी आज हतबल आला आहे. दुष्काळ, कर्जबाजारीपणा, शेतमालाला मिळणारा तोकडा दर यामुळे शेतकरी पार देशोधडीला लागला आहे. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत करणे गरजेचे असताना निसर्गासह मायबाप सरकारने शेतकऱ्यांची कायम साथ सोडल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरू आहे. या अधिवेशनात केवळ शेतकऱ्यांच्या मुलभूत प्रश्नांवर चर्चा करून चालणार नाही तर ठोस पाऊल उचलून सरकारला कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात शेतमालाची दरवाढ व्हावी, अशी अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात सुरू आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा विधिमंडळ अधिवेशनाची जय्यत तयारी करून अधिवेशनाल सुरुवात झाली आहे. विरोधी पक्ष सरकारला विविध प्रकारच्या मुद्द्यांवर जेरीस आणून मागण्या मान्य करण्यासाठी शासनाला धारेवर धरत आहे. यंदा शेतकरी अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडले आहेत.दुष्काळ, कर्जबाजारीपणा, महागाई यामुळे शेतकरी अगदी मेटाकुटीस आला आहे. शेतकऱ्यांचे दिवस आज वाईट असताना शेतकरी हिताचे निर्णय घेणे सरकारला आवश्यक आहे. शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. मात्र, शेतकऱ्यांना यातून बाहेर काढणारी व्यवस्था प्रभावी नाही. कापसावर शेतकरी मोठ्या प्रमाणात खर्च करतात.

मात्र, कापसाला केवळ ७ हजार रुपये भाव दिला जातो तर सोयाबीन ४ हजार ५०० रुपयांपर्यंत मजल मारते. सर्वच शेतमालाविषयी हीच स्थिती आहे. मात्र, त्याहीपलीकडे शेतकरी पिकांवर मोठ्या प्रमाणात खर्च करतात. शेतकऱ्यांनी केलेला खर्चही भरून निघत नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्येचा आकडा वाढत चालला आहे.



### कामकाज बंद करू नका, प्रश्न सोडवा!

सध्या वृत्तपत्रातील रकानेच्या रकाने आज विधिमंडळातील बातमीने छापून येत आहेत. विरोधी पक्ष सरकारवर हल्लाबोल करून विधिमंडळाचे कामकाज बंद करून सरकारला धारेवर धरेल. मात्र, कामकाज बंद करून प्रश्न सुटणार नाही तर यावर चर्चा करून कायमस्वरूपी उपाय होण्याची तरतूद झाली पाहिजे, अधिवेशनातून जनतेचे प्रश्न कायमस्वरूपी सुटले पाहिजे, अशी परिस्थिती निर्माण करणे गरजेचे आहे. दरवर्षी हिवाळी अधिवेशन नागपुरात भरवले जाते. विरोधी पक्ष विविध मागण्यांच्या फाइल घेऊन सरकारला धारेवर धरण्यासाठी हल्लाबोल करतात. मात्र, अनेक वर्षांपासूनचे जनतेचे प्रश्न काही केल्या सुटत नाहीत. हा अनेक वर्षांपासून चालत आलेला अलिखित नियम आजही तसाच कायम आहे.

# शेतकऱ्यांच्या हक्कासाठी हिवाळी अधिवेशन गाजविणार:-आ.नाना पटोले

## कापसाला १३ हजार तर सोयाबीनला ७ हजार हमीभावाची केली मागणी

## दर्यापूरात शेतकरी संवाद यात्रेचे जोरदार स्वागत व भव्य मेळावा संपन्न

**दि११विदर्भ प्रजसत्ताक दर्यापूर-** महाराष्ट्र सद्यास्थितीत दुष्काळग्रस्त परिस्थितीतून जात आहे.खरीप हंगामात कमी पावसामुळे नापिकी तर निष्क्रीय राज्यकर्त्यांमुळे कोणत्याच मालाला योग्य भाव नाही.एकीकडे दुप्पट हमीभाव देण्याचे आश्वासन देणाऱ्या मोदी सरकारने तीन काळे कृषी कायदे आणुन शेतकऱ्यांना संपवण्याचा घाट घातला होता. तर दुसरीकडे कापुस, सोयाबीन व कांद्याला उच्च भाव मिळत असतांना अवाजवी निर्यात धोरण राबवून शेतकऱ्यांच्या खिश्याला कात्री लावून त्यांना आर्थिक दुर्बल करण्याचं काळे कृत्य या सरकारने केले आहे. त्यामुळे या सरकारला जाब विचारण्यासाठी व शेतकऱ्यांच्या हक्कासाठी काँग्रेस पक्षाचे नेते हिवाळी अधिवेशन गाजविणार असून कापसाला १३ हजार तर सोयाबीनला ७ हजार हमीभावाची मागणी करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू असे प्रतिपादन महाराष्ट्र काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.नाना पटोले यांनी केले आहे.शेतक-यांच्या अनेक प्रश्नांसाठी महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाने किसान काँग्रेस विभागाच्या संयोजनाद्वारे शेतकरी संवाद यात्रा व नागपूर विधानभवनावर शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे,त्या शेतकरी संवाद यात्रेचे दर्यापूर येथे आगमन झाले, त्याप्रसंगी आयोजित भव्य मेळावा प्रसंगी ते बोलत होते.याप्रसंगी उपस्थित माजी मंत्री यशोमती ठाकूर म्हणाले की, शेतकरी संकटात असताना भाजप सरकार फक्त धार्मिक मुद्दे समोर करून जाती-धर्मात भांडणे लावण्यात मग्न असून त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे गांभीर्य नाही,शेतकरी बंधूना एक रुपयात मिळणाऱ्या विम्याचे काय झालं ? शासनाने ६६ हजार कोटी रुपये विमा कंपन्यांना देऊन सुध्दा शेतकरी विम्यापासून आजही वंचितच आहे.तरी या अधिवेशनात काँग्रेस पक्ष सरकारला जाब विचारण्यासाठी सज्ज झाला आहे,असे त्या म्हणाल्या.दर्यापूर शहरातील माहेश्वरी भवन येथे पार पडलेल्या शेतकरी संवाद यात्रेला महाराष्ट्र काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.नाना पटोले, माजी मंत्री आ.यशोमतीताई ठाकूर,आमदार वजाहत मिर्झा, माजी महापौर विलास इंगोले, अमरावती शहराध्यक्ष बबलूभाऊ शेखावत, तालुकाध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे, माजी जिल्हा परिषद सभापती बाळासाहेब हिंगणीकर,सुनिलभाऊ गावंडे सभापती कृ.उ.बा.स. दर्यापूर, महिला काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष कांचनमाला गावंडे, तालुकाध्यक्ष जयश्री चव्हाण,प्रमोद दाळू अध्यक्ष तालुका काँग्रेस कमिटी अंजनगाव सुर्जी,प्रदिप देशमुख शहराध्यक्ष काँग्रेस कमिटी अंजनगाव सुर्जी,आतिष शिरभाते शहराध्यक्ष काँग्रेस कमिटी दर्यापूर तसेच मोठ्या संख्येने अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे शहर व ग्रामीणचे पदाधिकारी व कार्यकर्ते , युवक काँग्रेसचे पदाधिकारी , किसान व मजदूर सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते या शेतकरी संवाद यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या शेतकरी संवाद यात्रेचे दर्यापूर नगरीत आगमन झाले त्यावेळी टाकळी, पनोरा, बस स्थानक चौक येथे भव्य स्वागत करण्यात आले व या संवाद यात्रेचे पुढे सभेत रूपांतर झाले व सुरवातीला दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे यांच्या वाढदिवस निमित्त भव्य सत्कार व त्यांची पुस्तकं व धान्य तुला करण्यात आली व सर्व उपस्थित पाहुणे यांनी त्याचे अभिष्टचिंतन केले.संवाद सभा संपल्यानंतर सर्व उपस्थित पाहुणे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट दिली व त्या परिसरात असणाऱ्या बेरोजगार टी-स्टॉल येथे कॉफी घेत या नव उद्योजक तरुणाला प्रोत्सान देत केंद्र व राज्य शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे युवक आज बेरोजगार होत असल्याचे नाना पटोले म्हणाले.या कार्यक्रमाचे संचालन कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अनिल भारसाकळे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्या साठी तालुका व शहर काँग्रेस कमिटी, तालुका युवक काँग्रेस ,महिला काँग्रेस व सर्व सेलचे पदाधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समिती व खरेदी विक्री संघाचे संचालक यांनी परिश्रम घेतले.

# चार महिन्याच्या बाळाच्या हृदयावर यशस्वी शस्त्रक्रिया

## प्रहार जनशक्ती पक्ष ,जीवन आधार व शालीनीताई मेघे हॉस्पिटल माध्यमातून मदतीचा आधार

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार** - प्रहार जनशक्ती पक्ष,जीवन आधार सामजिक संस्था व शालीनीताई मेघे हॉस्पिटल तर्फे चांदुर बाजार येथे महाआरोग्य कॅम्प चे आयोजन करण्यात आले होते या शिबिरा मध्ये हात मजुरी च्या रोजनदारी वर पोट भरणाऱ्या चांदुर बाजार तालुक्यातील हिरुळ पूर्णा येथील परिवार हा आपला उदरनिर्वाह करत होता त्याचे बाळ जिकरा फातीमा शारुख अली .वय ४ महिने या बाळा घेऊन शिबिराला चेकप करण्या करिता घेऊन आले होते मात्र या लहान बाळा ला सर्व हॉस्पिटल ला दाखून कुठे उपचार होत नसल्याचे डॉक्टर यांनी या परिवार यांना सांगितले होते अश्या परिस्थिती मध्ये हा परिवार मोठ्या संकटामध्ये सापडला होता या मध्ये त्यांनी प्रहार आरोग्य कॅम्प व जीवन आधार आरोग्य शिबीर ला भेट देऊन आपल्या बाळा ला डॉक्टर यांना दाखवले डॉक्टर यांनी त्यांना नागपूर येथे हॉस्पिटल भरती होण्याकरिता सांगितले तेव्हा प्रतिकूल परिस्थितीत हा आशेचा 'किरण' त्या परिवार वर उगवल्याने सारेच आनंदले होते. या धक्क्याने पार कोलमडून गेलेल्या त्याच्या परिवार यांना डॉक्टरांच्या रूपात भेटलेल्या देवदूतांनी व देवदूत जीवन जवंजाळ यांनी धीर दिला आणि अवघ्या चार महिन्यांच्या किरणवर शस्त्रक्रिया करण्याचा नाजूक निर्णय यशस्वीपणे अमलातही आणून दाखविला.चार महिन्याच्या बाळाच्या हृदयाला असलेल्या छिद्रावर यशस्वी शस्त्रक्रिया करुन एका लहानग्याला जीवनदान देणाऱ्या शालिनीताई मेघे रुग्णालयाच्या कॉर्डिओलॉजी विभागाचे प्रमुख व त्यांची टीम डॉ.मनीष चोखंडे (बाल हृदयरोग तज्ञ)डॉ.अभय तिडके (हृदयरोग तज्ञ),डॉ.राहुल बारई (हृदयरोग तज्ञ),डॉ.किरण व्यवहारे (अनेस्थेटीक)तंत्रज्ञ श्री. चैतन्य कौरसे,श्रीमान प्रथमेश गिते नर्सिंग स्टाफ सौ. शारदा काळे श्री.सूरज झोटिंग कु. प्राची श्री.प्रभात भुरसे. या सर्वांनी यशस्वीरीत्या शास्त्र किया करून चार महिन्याच्या बाळाला नवजीवन दान दिले आहे त्याबद्दल मा श्री आमदार बच्चूभाऊ कडू, जीवन आधार संस्थे अध्यक्ष जीवन जवंजाळ , संतोष कीटूकले, दीपक भोगाडे, रणजित देशमुख, मंगेश देशमुख , जेष्ठ पत्रकार सुरेशराव सवळे, सागर सवळे , सुयोग गोरले आदी कडून सर्व डॉक्टर टीम चे कौतुक केले आहेलहान मुलांच्या हृदयावर शस्त्रक्रिया करणे अत्यंत कठीण काम असते, कारण अशावेळी त्यांच्या जीवाला जास्त धोका असतो, मात्र एका लहानग्यासाठी डॉक्टरांनी देवदूतासारखी भूमिका निभावत ही किमया करून दाखवली आहे.चार महिन्याच्या बाळाच्या हृदयाला असलेल्या छिद्रावर यशस्वी शस्त्रक्रिया करुन एका लहानग्याला जीवनदान दिले आहेचांदुर बाजार तालुक्यातील हिरुळ पूर्णा येथील रहिवाशी बाळ जिकरा फातीमा शारुख अली .वय ४ महिने यांच्या चार महिन्याच्या लहान मुलाला श्वास घेण्यास त्रास आणि पुरेशी झोप येत नसल्याचे चेकप केल्या नंतर डॉक्टर टीमच्या निदर्शनास आले होते त्यानंतर त्यांनी शालीनीताई मेघे हॉस्पिटल येथील रुग्णालयात या बाळाच्या चाचण्या केल्या त्यावेळी या बाळाच्या हृदयाला काही डॉक्टरांशी संपर्क केल्यानंतर हृदयाचा आकार लहान असल्यामुळे शस्त्रक्रिया करण्यास अडचण असल्याचे डॉक्टरांनी सांगितले त्या करिता जीवन आधार संस्थे अध्यक्ष जीवन जवंजाळ, डॉ अनुम मरार डायरेक्टर, डॉ वसंत गावंडे,डॉ अश्विन रडके , सुयोग गोरले सहसचिव जीवन आधार यांच्या सोबत चर्चा करण्यात आली व डॉक्टर यांना धीर देण्यात आले व बाळा आपण प्रयत्न करा असे सांगण्यात आले व या सर्व डॉक्टर यांनी देवांचे नाव घेऊन सर्वात मोठे ऑपरेशन सक्सेसफुल करून दाखवले त्या बदल शालिनीताई मेघे हॉस्पिटल नागपूर व जीवन आधार सामाजिक संस्था नागपूर यांचे महाराष्ट्र कौतुक होत आहे व शस्त्रक्रियेनंतर बाळाच्या प्रकृतीत सुधारणा झाली असून बाळाचा आहार आणि झोप व्यवस्थित होत असल्याचे डॉ.नी सांगितले आहे.



### लग्नसमारंभ, वाढदिवस तसेच मोठ्या प्रमाणात जेवणाचे कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी आता

# अन्न व औषध प्रशासनाची रीतसर परवानगी लागणार

### - अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक गडचिरोली :** राज्यात लग्नसमारंभ, वाढदिवस तसेच मोठ्या प्रमाणात जेवणाचे कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी आता अन्न व औषध प्रशासनाची रीतसर परवानगी घ्यावी, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी निर्देश दिले आहेत. गडचिरोली येथे अन्न व औषध विभागाच्या इमारतीचे भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

काही दिवसांपूर्वी मंत्री आत्राम यांनी विधानभवन परिसरातील उपहारगृहातील अस्वच्छतेबद्दल भाष्य करून त्यांना अन्न व औषध प्रशासनाची परवानगीची अट घातली होती. अनेकदा जेवणातून होणाऱ्या विषबाधेचे प्रकरण समोर आले आहे. त्यामुळे लग्नसमारंभ असो की वाढदिवस ज्या ठिकाणी जेवणाचे मोठे आयोजन केल्या जाते यापुढे त्यांनादेखील अन्न व औषध प्रशासनाची परवानगी घ्यावी लागेल, असे मंत्री आत्राम म्हणाले. गडचिरोली येथे आजपर्यंत अन्न व औषध विभागाची स्वतंत्र इमारत नव्हती. मात्र, आपण मंत्री झाल्यानंतर सर्वात आधी यासाठी प्रयत्न केले व आज त्याचे भूमिपूजन पार पडत आहे, असेही आत्राम यांनी यावेळी सांगितले.



# नांदगाव पेठ येथे निशुल्क महाआरोग्य रोगनिदान शिबीर१५ डिसेंबर ला

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ –** शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, जीवनविकास संस्था नागपूर तसेच भाजप ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने १५ डिसेंबर रोजी नांदगाव पेठ येथील ग्रामपंचायत प्रांगणात निशुल्क महाआरोग्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. भाजपा महाराष्ट्र प्रदेश ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या वतीने आयोजित या महाआरोग्य शिबिराच्या नोंदणीला प्रारंभ झाला आहे. या आरोग्य शिबिरात मेडिसिन, स्त्री रोग, अस्थीरोग, नेत्ररोग, बालरोग, दंतरोग,न्यूरॉलिजी, शल्य चिकित्सक, कान, नाक, घसा, मेंदू शस्त्रक्रिया (न्यूरो सर्जन),किडनी रोग तज्ञ, हृदयरोग चिकित्सक आदी व्याधींवर तज्ञ वैद्यकीय चिकित्सक तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत. रुग्णांना औषधोपचार देखील निशुल्क असून शिबीरस्थळी रक्तदाब, मधुमेह तपासणी निशुल्क वाहन व्यवस्था करण्यात आलेली आहे. शिबिराला सकाळी १० वाजता प्रारंभ होणार असून सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे शिबीर असणार आहे.परिसरातील जास्तीत जास्त रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा तसेच वेळेवर गैरसोय होऊ नये यासाठी आपल्या नावाची नोंदणी शिबिरापूर्वीच करावी असे आवाहन करण्यात आले आहे.शिबिरामध्ये नाव नोंदणी करण्यासाठी सचिन इंगळे-९६७३१६०७७७, अमोल व्यवहारे-९७६७६६८४२१,अनुप भगत-९६६५१०६५६७१, अंकुश चौधरी-८८८८०४४४५८ यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# स्वर्गीय अशोक सोमाणी स्मृती प्रित्यर्थ ३७ वे रक्तदान शिबिर...

## ' रक्ताचा थेंब न थेंब मनुष्याकरता वरदान, उठा चला करू या रक्तदान '

### आमदार सौ.सुलभाताई खोडके यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन रक्तदात्यांचा सत्कार

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** पूर्ण शारीरिक आरोग्यासाठी रक्तदान फायदेशीर ठरते. रक्तदानाचे शारीरिक अनेक फायदे आहेत, मात्र मानसिक फायदा अधिक आहे. जेव्हा तुम्ही रक्तदान करता तेव्हा तुम्हाला एक वेगळीच सुखद अनुभूती येते. आपल्या रक्तामुळे कोणाचे तरी प्राण वाचले आहेत ही भावनाच तुम्हाला आनंद देऊन जाते.हाच आनंद तुमच्या मानसिक स्थितीला संतुलित राखण्यासाठी महत्वाचा ठरतो.आणि रक्तदान करून तुम्ही मानसिक दृष्ट्या सक्षम होता. महेंद्र भुतडा व त्यांचे सर्व सहकारी यांचेसह अमरावती जिल्हा रक्तदान समितीने रक्तदान चळवळीला गती देऊन ' रक्तदान म्हणजेच सर्वश्रेष्ठ दान ' याचे सर्वांना महत्व पटवून दिले आहे.समाजाचे ऋण फेडण्याची ही एक संधी रक्तदानामुळे मिळते.असे प्रतिपादन आमदार-सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी स्वर्गीय अशोक सोमाणी यांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित रक्तदान शिबीर कार्यक्रम प्रसंगी उपस्थितांना संबोधून केले.रविवार दिनांक १० डिसेंबर २०२३ रोजी व्यंकटेश लॉन च्या बाजूला शिलांगण रोड स्थित बी पॉझिटिव्ह येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. सर्वप्रथम आमदार सुलभाताई खोडके यांनी स्वर्गीय अशोक सोमाणी यांच्या प्रतिमेस वंदन-पूजन-माल्यार्पण केल्यानंतर या कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी कार्यक्रमाचे उदघाटक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष, प्रवक्ते,विधिमंडळ समनवयक-संजय खोडके तसेच प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित माहेश्वरी पंचायत समितीचे उपाध्यक्ष-सुरेश साबू व नंदकिशोर राठी यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन करण्यात आले.यावेळी स्वर्गीय अशोक सोमाणी यांना उपस्थितांचे वतीने मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यादरम्यान आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते स्वेच्छा रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती च्या वतीने २०२३ या वर्षाकरिता प्राचार्य-डॉ. अरविंद देशमुख यांना सर्वश्रेष्ठ प्राचार्य म्हणून पुरस्कार देण्यात आल्याबद्दल संजय खोडके यांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. संपूर्ण विदर्भात स्वर्गीय अशोक सोमाणी यांच्या स्मृती प्रित्यर्थ अखंडितपणे आयोजित दरवर्षी अखंडितपणे सोमाणी व भुतडा परिवाराच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे.





# अमरावतीत अकरा महिन्यांत आढळले डेंग्यूचे ५४४ रुग्ण

## एकाचा मृत्यू; गतवर्षीच्या तुलनेत रुग्णांच्या संख्येत तीनपट वाढ

**दि. ११ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** जिल्ह्यात कीटकजन्य आजारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. वातावरणातील थंडावा हा कीटकजन्य आजार वाढीस कारणीभूत ठरत असून, जिल्ह्यात अकरा महिन्यांत ५४४ डेंग्यू रुग्ण आढळले आहेत. तर २१ ऑक्टोबरला एका डेंग्यू पॉझिटिव्ह रुग्णाचा मृत्यूदेखील झाला आहे. वर्ष २०२२ मध्ये जानेवारी ते नोव्हेंबर या कालावधीत १८५ डेंग्यू रुग्ण होते. त्यामुळे यंदा ही आकडेवारी तीनपटीने वाढली असून आरोग्य विभागाची डोकेदुखी वाढली आहे.

कीटकजन्य आजारांचे प्रमाण हे पावसाळ्यात वाढायला सुरूवात होते. ज्यामध्ये डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया हे आजार डोके वर काढतात. जागोजागी साचणाऱ्या पाण्यामध्ये डेंग्यू आजार पसरविणारे डास वाढतात. सध्या वातावरणातील बदलामुळे निर्माण झालेला थंडावा हे कीटकजन्य आजार वाढीसाठी कारणीभूत ठरत असल्याचे आरोग्य प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यामुळे नागरिकांनी ताप, डोकेदुखी, सांधेदुखी, अंगावर पुरळ येणे यासारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता तातडीने रुग्णालयात जाऊन रक्ताची चाचणी करण्याची गरज आहे. जिल्ह्यात जून २०२३ पासून डेंग्यू रुग्णांची संख्या वाढण्यास सुरूवात झाली असून, सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या तीन महिन्यांमध्ये सर्वाधिक डेंग्यू रुग्ण आढळले आहेत. तर ऑक्टोबर महिन्यात एका पॉझिटिव्ह रुग्णाच्या मृत्यूचही नोंद आरोग्य प्रशासनाने केली आहे.




### ११६ चिकुनगुनिया तर ३३ मलेरिया रुग्णांचीही नोंद

जिल्ह्यात डेंग्यूबरोबरच अकरा महिन्यांमध्ये ११६ चिकुनगुनिया रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये ग्रामीण भागात ७९ तर मनपा क्षेत्रात ३७ रुग्ण आढळले आहेत. त्याचबरोबर मलेरियाचे एकूण ३३ रुग्ण असून, ग्रामीण क्षेत्रात २८ तर मनपा क्षेत्रात ५ रुग्ण आढळले आहेत.

### महापालिका क्षेत्रात सर्वाधिक रुग्ण

महापालिका क्षेत्रात सर्वाधिक डेंग्यू रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रात १०२७ डेंग्यू संशयित रुग्णांचे रक्तजल नमुने आरोग्य विभागाने तपासले असता, यामध्ये ३३३ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले आहेत. यामध्ये एकाचा मृत्यूदेखील डेंग्यूमुळे झाल्याची नोंद आरोग्य प्रशासनाने केली आहे तर ग्रामीण भागातील १२८८ संशयित रुग्णांमध्ये २११ रुग्णांचा अहवाल डेंग्यू पॉझिटिव्ह आला

गुटखा कंपन्यांसाठी केलेल्या जाहिरातींच्या संदर्भात

# अक्षय कुमार, शाहरुख खान व अजय देवगण यांना उच्च न्यायालयाने बजावली नोटीस

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक मुंबई –** अभिनेता अक्षय कुमार, शाहरुख खान व अजय देवगण यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. अवमान याचिकेला उत्तर देताना केंद्र सरकारने अलाहाबाद न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठाला ही माहिती दिली आहे. त्यांनी गुटखा कंपन्यांसाठी केलेल्या जाहिरातींच्या संदर्भात अभिनेता अक्षय कुमार, शाहरुख खान आणि अजय देवगण यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

केंद्र सरकारच्या वकिलांनी शुक्रवारी उच्च न्यायालयाला माहिती दिली की, सर्वोच्च न्यायालयातही या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. त्यामुळे ही याचिका तातडीने फेटाळण्यात यावी. युक्तिवादानंतर खंडपीठाने पुढील सुनावणीसाठी ९ मे २०२४ ही तारीख निश्चित केली आहे. न्यायमूर्ती राजेश सिंह चौहान यांच्या खंडपीठाने आधी केंद्र सरकारने याचिकाकर्त्याच्या प्रतिनिधित्वावर निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले होते. मोठे पुरस्कार मिळूनही गुटखा कंपन्यांच्या जाहिराती करणारे अभिनेते आणि मान्यवर यांच्यावर कारवाई व्हायला हवी, असं



त्यांचं म्हणणं होतं.

याचिकाकर्त्याने सुनावणीदरम्यान असंही सांगितलं की, २२ ऑक्टोबर रोजी या अभिनेत्यांच्या वतीने लोकांनी सरकारसमोर आपले म्हणणे मांडले होते. मात्र, तरीही याप्रकरणी कोणतीही कार्यवाही झाली नाही. यानंतर अवमान याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या कॅबिनेट सचिवांना नोटीस बजावली होती, त्यानंतर शुक्रवारी डेप्युटी सॉलिसिटर जनरल एसबी पांडे यांनी न्यायालयाला सांगितलं की, केंद्राने अक्षय कुमार, शाहरुख खान आणि अजय देवगणला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

# आयोगावर दबाव आणण्यापेक्षा जातनिहाय जनगणना घोषित करा

## आमदार यशोमती ठाकूर यांची मागणी

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** आगामी निवडणुकांच्या तोंडावर मराठा समाजाला तात्पुरता दिलासा देण्यासाठी हे सरकार घाईघाईत केवळ मराठा आणि ओबीसी समाजाचे सर्वेक्षण करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगावर दबाव आणत आहे. राज्य सरकारच्या या दडपशाही विरोधात अर्धन्यायिक अधिकार असलेल्या या संवैधानिक संस्थेच्या सदस्यांनी राजीनामे दिले आहेत. वास्तविक जातनिहाय जनगणना हाच राज्यात निर्माण झालेल्या आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा आहे. त्यामुळे सरकारने जातनिहाय जनगणना घोषित करावी, अशी मागणी काँग्रेसच्या आमदार यशोमती ठाकूर यांनी केली आहे.यशोमती ठाकूर म्हणाल्या, राज्य सरकारचे डोके ठिकाणावर नाही. या सरकारला जातीजातींमध्ये भांडण लावायचे आहे. जातनिहाय जनगणना या अधिवेशनात सरकारने घोषित करावी, अशी आमची मागणी आहे. या प्रश्नासंदर्भात सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यालयात सर्वपक्षीय बैठक बोलवावी, आम्ही यायला तयार आहोत. मात्र, लोकांची फसवणूक सुरू आहे. जातनिहाय जनगणना करावी आणि मराठा समाजाला शाश्वत आरक्षण द्यावे.





तसेच इतर घटकांना त्यांच्या संख्येप्रमाणे आरक्षण मिळाले पाहिजे. हीच भूमिका राज्य मागासवर्ग आयोगाची आहे. त्यामुळे त्यांना समाजातील सर्व घटकांचे जात निहाय सर्वेक्षण करू द्यावे, काही विशिष्ट समाजांचे सर्वेक्षण केल्याने प्रश्न सुटणार नाही कोणत्याही समाजाला तात्पुरता दिलासा देऊन त्याची फसवणूक करू नका.जातनिहाय जनगणना व्हावी, ही मागणी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी यापूर्वी मांडली आहे. त्यामुळे सरकारने या अधिवेशनात जातनिहाय जनगणना घोषित करावी आणि कोणत्याही न्यायिक संस्थेवर कसलाही दबाव आणू नये, असेही यशोमती ठाकूर यावेळी म्हणाल्या.

# यावर्षी थंडीचा पॅटर्न वेगळाच, दिवसा थंडी पहाटे मात्र राहणार कमी

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** सध्या देशातील हवामानात सातत्यानं बदल होत आहे. कुठं थंडी आहे तर कुठं ढगाळ वातावरण आहे, तर काही भागात अवकाळी पाऊस (ठळप) पडत आहे. दरम्यान, २०२३ च्या एल-निनो वर्षात दर वर्षासारखी थंडी नाही. यावर्षी ती कशी वळण घेऊ शकते, हे बघणेही गमतीशीर आहे. ८ डिसेंबरपासून डिसेंबर महिन्याच्या थंडीला जरी सुरुवात झाली असली तरी, सध्याचा थंडीचा पॅटर्न जरा वेगळाच जाणवत असल्याची माहिती ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली. सध्या दिवसा थंडी वाजत असून, त्यामानाने पहाटेचा गारवा कमीच असल्याची माहिती खुळे यांनी दिली. सध्याच्या हवामानाबाबत माणिकराव खुळे यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

### दुपारचे सध्याचे कमाल तापमान व त्याचा परिणाम

विदर्भ वगळता, कोकणासहित उर्वरित महाराष्ट्रात सध्या दुपारचे कमाल तापमान हे २७ डिग्री से. ग्रेडच्या तर विदर्भात २५ डिग्री से. ग्रेडच्या दरम्यान जाणवत आहे. म्हणजेच दरवर्षीच्या सरासरी तापमानापेक्षा विदर्भात जवळपास ४ डिग्री से. ग्रेडने तर कोकणासहित उर्वरित महाराष्ट्रात २ डिग्री से. ग्रेडने कमी आहे. दुपारच्या तापमानातील ही ठळक व स्पष्ट जाणवणारी मोठी गिरावट आहे. त्यामुळं दिवसा चांगलीच थंडी तर वाजतेच आहे. निरभ्र आकाशामुळे सूर्यप्रकाशाला अडथळा नाही. सूर्यप्रकाश भरपूर असला, तरीदेखील ह्या दिवसात दिवसाची लांबीही कमी असते. म्हणूनच खालावलेल्या कमाल तापमानामुळं दैनिक सापेक्ष आर्द्रताही सरासरीपेक्षा खुप आणि खुपच घसरलेली आहे. त्यामुळेच साहजिकच सध्या दमटपणा कमी जाणवत आहे. हवेत कोरडेपणा वाढला आहे. म्हणून तर सध्या पहाटेच्या किमान तापमानातही वाढ होऊनही सकाळी थंडी जाणवतच आहे.



थंडीचा हा पॅटर्न कदाचित संपूर्ण हिवाळ्यात म्हणजे फेब्रुवारी अखेरपर्यंत असाच राहू शकतो. फेब्रुवारी आणि मार्चमध्ये होणारी गारपीटही कमी होऊ शकते. दव, बादड पडण्याचे प्रमाणही कमी राहू शकते. या महिन्यअखेरपर्यंतच चक्रीवादळ आणि आयओडीचा काळ असून, नंतर संपणार आहे. एल-निनो त्याच्या तीव्रतेत असल्यामुळं डिसेंबर महिन्यात महाराष्ट्रात पावसाची शक्यता कमी असुन झाला तरी तो डिसेंबर महिन्याच्या मासिक सरासरीपेक्षा कमी असु शकतो.

### पहाटेचे सध्याचे किमान तापमान व त्याचा परिणाम

खरतर डिसेंबर हा अति थंडीचा महिना मानला जातो. थंडीच्या तीव्रता मोजण्याचा (म्हणजे थंडी कमी किंवा जास्त ) हा ' किमान तापमान किती आहे?' हेच ठरवते. म्हणजे थंडी तीव्रता ठरवण्याचा निर्देशक घातांक किमान तापमानच आहे. सध्याचे किमान तापमान हे सरासरी इतके किंवा त्यापेक्षा कमी असावयास हवे. तरच चांगली थंडी जाणवते. परंतू, यावर्षी सध्या संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेचे किमान तापमान हे १७ डिग्री से. ग्रेडच्या दरम्यान जाणवत आहे. हे दरवर्षीच्या सरासरी तापमानापेक्षा कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात २ डिग्री से. ग्रेडच्या तर उर्वरित महाराष्ट्रात जवळपास ४ डिग्री से. ग्रेडने अधिक आहे. त्यामुळं थंडी जाणवण्यास सुरुवात झाली पण त्याचा म्हणावा तसा कडाका जाणवत नाही.

# 'स्वयंम'पासून हजारो आदिवासी विद्यार्थी वंचित

## संकेतस्थळ 'जैसे थे'

### शासनाने वयाची अट ३० वर्षे केली; पण आयुक्तालयातून सुधारणाच नाही.

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** आदिवासी विकास आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर जुनीच माहिती असल्यामुळे शासकीय वसतिगृहात प्रवेशापासून वंचित असलेल्या अनुसूचित जमातीच्या हजारो विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेपासून मुकावे लागले आहे. शासनाने या योजनेसाठी वयाची अट २८ ऐवजी ३० वर्षे केली तरिही 'ट्रायबल'च्या ढिसाळ कारभारामुळे आदिवासी विद्यार्थी सैरभैर झाले आहेत.

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता बारावीनंतरच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या; परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या एकूण २० हजार संख्येच्या मर्यादित अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घेण्यासाठी तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तर व मोठ्या शहरांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक




खात्यामध्ये देय असलेली रक्कम थेट जमा करण्याबाबत ' पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम योजना सुरू करण्यात आली आहे.

अशी आहे खर्चाची तरतूद

मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई ,ठाणे ,पुणे ,पिंपरी-चिंचवड, नागपूर याठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिविद्यार्थी वार्षिक खर्च ६० हजार रुपये, तर महसुली विभागीय मुख्यालय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिविद्यार्थी एकूण संभाव्य वार्षिक खर्च ५१ हजार रुपये दिले जाते.

शासन निर्णय निर्गमित करुन सात महिने झाले. वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही म्हणून विद्यार्थी रूम करुन भाड्याने राहतात. भोजनासाठी मेस लावतात. शैक्षणिक साहित्याचा खर्च करतात. आता विद्यार्थी स्वयं योजनेसाठी अर्ज करीत आहेत तर अपात्र दाखवितात. शासन निर्णयानुसार तत्काळ संगणकीय प्रणालीमध्ये बदल करुन विद्यार्थ्यांना स्वयं योजनेची संधी उपलब्ध करुन द्यावी. – ड. प्रमोद घोडाम, संस्थापक अध्यक्ष, ट्रायबल फोरम.

# लोकअदालत: कौटुंबिक न्यायालयाने मिटविले नऊ कौटुंबिक वाद; समुपदेशनावर भर

## 'भांडणापेक्षा समझौता बरा, कौटुंबिक सौख्यातच आनंद खरा'

**दि. ११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम.आर. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ९ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात आली होती. यात ३३ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली. पैकी नऊ प्रकरणे निकाली काढण्यात यश आले.



'भांडणापेक्षा समझौता बरा, कौटुंबिक सौख्यातच आनंद खरा'असा संदेश देवून निकाली निघालेल्या नऊ प्रकरणांपैकी दोन प्रकरणांत संबंधित पक्षकारांचा संसार पुन्हा जुळविण्यात आला. कौटुंबिक न्यायालयाच्या पुढाकाराने घटस्फोट टाळून त्यांनी एकत्र संसार करण्याचा निर्णय घेतला. सात प्रकरणांमध्ये आपसी सहमतीने तडजोड करण्यात आली. लोकअदालतीमध्ये मुख्य न्यायदंडाधिकारी ए. व्ही. कस्तुरे यांनी पॅनल जज म्हणून, तर ड. रुचिता तुळजापुरे यांनी पॅनल सदस्य म्हणून काम पाहिले.

लोक अदालतीला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी. आर. पाटील यांनी भेट दिली. कौटुंबिक न्यायालयातील ही लोक अदालत यशस्वी होण्यासाठी न्यायाधीश आर. आर. पोंदकुले यांच्या मार्गदर्शनात प्रभारी प्रबंधक प्रदीप चोरे, न्यायालयीन व्यवस्थापक धनंजय क्षिरसागर, लिपीक अलका चोबे व स्नेहा इंगोले, एस. आर. बाकडे आदींनी परिश्रम घेतले.

# पाऊस थांबला : रबीच्या आंतरमशागतीला वेग

**दि. ११ विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी–** गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पावसाने आगमन केल्यामुळे रबी पिकामध्ये नगदी पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरभरा पिकाची आंतरमशागत थांबली होती. आता अवकाळी पाऊस थांबल्यानंतर परिसरामध्ये रवी पिकांना आंतरमशागतीला वेग आला.

करताना दिसत आहे. कोणत्याही शेतात गेल्यानंतर प्रथमतः हरभऱ्याच्या झाडावर



मोठ्या प्रमाणात अळी दिसून येत आहे. त्यामुळे रबी हंगामातील हरभरा पिके जातील की काय, अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांना व्यक्त केली असली तरीही कावली, वसाड, अशोकनगर, गुंजी, तरोडा, दाभाडा, शिदोडी, वाठोडा, िचचपूर, पिंपळखुटाआंतरमशागत पूर्णतः थांबल्याने अळीचा प्रकोप मोठ्या प्रमाणात झाला, ती रोखण्यासाठी परिसरातील अनेक शेतकरी आपल्या हरभरा या पिकावर अनेक महागडी औषधे फवारणी करतांना दिसत आहे.

या गावात प्रामुख्याने सोयाबीन पिकानंतर हरभरा कोरडवाहू जमिनीत घेतला जाते. आठवड्याभरापासून अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात आगमन केल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला होता.

# चिखलदरा थंडा थंडा ...कुल कुल....

**दि. ११ विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा–** ऋतूचक्र फिरल्याने अलीकडे हिवाळा आणि पावसाळा एकाच वेळी निदर्शनास येत आहे. तथापि, हा प्रकार चिखलदऱ्याला येणाऱ्या पर्यटकांना सुखद अनुभूती देणारा ठरला आहे. पांढऱ्या शुभ्र दाट धुक्यात हरविणारे नंदनवन हिरवेगार झाले असून, ऊन-सावल्यांच्या खेळामुळे ते दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे ठरले आहे.चिखलदरा पर्यटनस्थळाला पर्यटक दरवर्षी भेट देतात. पावसाळ्यात ती गर्दी लाखांवर जाते. हिवाळ्यात शाळा-महाविद्यालयांच्या सहली, तसेच



दिवाळी आणि वीकेंडला पर्यटक गर्दी करतात. थंडगार हवेची झुळूक, अंगाला झोंबणारी थंडी यामुळे गरम कपडे घालूनच येथे फिरावे लागते. अशात आता १५ दिवसांपासून अवकाळी पावसामुळे वातावरण पूर्णतः गारठले आहे.

# परतवाड्यात निसर्गप्रेमीच्या सहकार्यातून बीज बँक

## सर्वसामान्य करतील बियांचे आदानप्रदान : प्राचार्य डॉ.एकनाथ तट्टे यांचा पुढाकार

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक परतवाडा**

मेळघाटच्या पायथ्याशी वसलेल्या परतवाडा येथील बी.एस.पी.महाविद्यालयात एक आगळ्यावेगळ्या बँकेची उभारणी होत आहे. या बँकेत पैसेच्या विनिमयाऐवजी देशी वाणाच्या बियाण्याचे आदानप्रदान होणार आहे. विशेष म्हणजे बँकेतील नियमानुसार व्याज, सरळव्याज,परतफेड, एफ.डी. या बाबी इथे अनुभवाला मिळणार आहे. भावी पिढीच्या हरित भवितव्याची तजवीज या बँकेच्या माध्यमातून होणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एकनाथ तट्टे यांनी यासाठी पुढाकार घेतला असून अनेक निसर्ग प्रेमी या कार्यात त्यांना सहकार्य करत आहे.

आजची तरुण पिढी हि सध्या मोबाईलच्या विळख्यात सापडली असून ती निसर्गापासून दुरावली आहे. जैवविविधता टिकून ठेवण्यासाठी जल, जमीन, जंगल यांचे अनन्यसाधारण महत्व आहे. तरुण पिढीला जैवविविधतेचे महत्व कळावे शिवाय दुर्मिळ, धोकाग्रस्त व लुप्त होणार्या वनस्पतीचे संवर्धन व्हावे या उद्देशाने हि बँक (पेढी) उभारली जाणार आहे. महाविद्यालयातील दोन खोल्यांमध्ये विविध कंटेनरमध्ये देशी वृक्ष, रानभाजी, वेली, गवत, धान्य, भरड धान्य, कंद आदी प्रजातींचे बीज संकलन केले जाणार आहे व सर्वसामान्य व्यक्तींसाठी ते मोफत स्वरुपात उपलब्ध होणार आहे. याकरिता महाविद्यालयातील ३० जणाची चमू कार्य करणार आहे. यात २० विद्यार्थीसह प्राध्यापकांचा समावेश राहणार आहे. मेळघाटातील तिवस, पिवळा पळस, बाभळी, मेढसिंगी, रानबाभूळ, शमी, दहिपळस आदी १०० दुर्मिळ वनौषधीसह भरड धान्य राळा, सावा, कोदो, कुटकी, जगणी (तेलबिया) आदींची साठवणूक राहणार आहे.

या बँकसाठी संपूर्ण देशात ग्रासमॅन म्हणून परिचित असलेले डॉ.गजानन मूरतकर, दिगंबर नेमाडे (उपायुक्त), जिल्हा परिषद शाळा जैतादेहीचे मुख्याध्यापक गणेश जामुनकर, आदर्श शिक्षक जितेंद्र राठी, वनौषधी अभ्यासक अनिल चौधरी, निसर्ग अभ्यासक शशांक लावरे , धामणगाव गढी येथील नागरिक आदींचे या पेढीसाठी महत्वाचे योगदान लाभत आहे. २३ डिसेंबर रोजी मिलिंद गिरधारी, शिवशंकर चापूले या वनस्पती अभ्यासकांच्या उपस्थितीत या बँकेचा शुभारंभ करण्याचा मानस डॉ. एकनाथ तट्टे यांनी व्यक्त केला.




### तीन दिवसीय अभ्यास दौरा

मेळघाटातील दुर्मिळ वनस्पती, वनसंपदा, खळखळनार्या नद्या, डोगरदर्यांचा अभ्यास करण्यासाठी २३ ते २५ डिसेंबर दरम्यान राज्यातील नामवंत वनस्पती अभ्यासक मिलिंद गिरधारी, शिवशंकर चापूले, ओम धुत्तरगावकर, राहुल घोलप, अनिल चौधरी, ऋषिकेश दरेकर, दिगंबर नेमाडे, डॉ.एकनाथ तट्टे जितेंद्र राठी, मंगेश वाहाणे आदीसह अनेक निसर्ग अभ्यासक तीन दिवसीय अभ्यास दौरा करणार आहे.

# सिआरपीएफ जवानाचा अपघातात मृत्यू

## चार महिन्यापूर्वीच झाला होता रूजू

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव सुर्जी**

येथील रहिवासी सागर विश्वासराव माकोडे (वय २६ वर्ष) हा बालाघाट येथे सीआरपीएफमध्ये कार्यरत होता. सेवेवरून घरी परत येत असताना शनिवारी मध्यरात्री गावाजवळच दुचाकीचा अपघात होऊन त्याचा मृत्यू झाला. बालाघाट येथून सागर परतवाडापर्यंत आला. येथून अंजनगाव येथे घरी येण्यास गाडी उपलब्ध नसल्यामुळे त्याने त्याचा मित्र नंदकिशोर दातीर याला परतवाडा येथे मोटरसायकल घेऊन बोलावले.



मित्राच्या गाडीवर घरी येत असताना रात्री १२ वाजताचे दरम्यान घराचे अंतर अवघे ५ मिनिटाचे असताना पारीख पेट्रोल पंपाजवळ त्यांची दुचाकी दुभाजकावर आदळली. त्यात सागर माकोडे याचा जागेवरच मृत्यू झाला. तर सोबतीला असलेला मित्र नंदकिशोर दातीर जखमी आहे. अमरावती येथे त्यांच्यावर उपचार सुरू आहे.सागर माकोडे याच्या पश्चात आई, वडील, दोन भाऊ असा परिवार आहे. त्यांच्यावर अंजनगाव स्मशानभूमित यवतमाळ येथील सिआरपीएफ चमुच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

सागर एक वर्षाचे प्रशिक्षण घेऊन चार महिन्यापूर्वीच रुजू झाला होता. आई-वडीलांनी अत्यंत बिकट परिस्थितून मार्ग काढत मुलांना शिकविले. सागरचा मोठा भाऊ पुणे येथे कंपनीत असून लहान भाऊ नुकताच आसाम येथे बीएसएफमध्ये रुजू झाला आहे. तिघेही मुले नोकरीला लागले असल्याने आई, वडील आनंदात होते. अचानक सागरवर काळाने झडप घातल्याने परिवारावर दुःखाचाचा डोंगर कोसळला आहे.

# काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांचे प्रहारमध्ये पक्षांतर

## देऊरवाडा व निंभोऱ्यात काँग्रेसला खिंडार

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक चांदूर बाजार**

तालुक्यातील देऊरवाडा व निंभोरा येथे काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आ. बच्चू कडू यांच्या सर्वसमावेशक विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवत बच्चू कडू यांच्याच उपस्थितीत प्रहार जनशक्ती पक्षात प्रवेश केला आहे. प्रवेश केलेल्यांमध्ये युवक काँग्रेसचे अचलपूर मतदार संघप्रमुख विकास सोनार, माजी उपसरपंच बब्बूभाई व निंभोरा येथील असंख्य कार्यकर्त्यांचा समावेश आहे.



काँग्रेस पक्ष सतत पराभवाच्या गर्गेत जात असताना, यादरम्यान राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रा काढून काँग्रेस पक्षात दम भरण्याचा प्रयत्न केला, परंतु नुकत्याच झालेल्या तीन राज्याच्या निवडणुकीत काँग्रेस विजयी होऊ शकली नाही. त्याचा परिणाम म्हणून काँग्रेसमधून इतर पक्षात जाणार्या नेत्यांचे व कार्यकर्त्यांचे प्रमाण वाढले आहे. अशातच काही दिवसांपासून अचलपूर मतदारसंघाच्या राजकारणात उलटापालट सुरू असून कांग्रेसमधून प्रहार पक्षामध्ये प्रवेश घेणार्यांची संख्या वाढत आहे. नुकताच शहापूर येथील काँग्रेसचा एक मोठा गट प्रहारमध्ये आला असताना, देऊरवाडा व निंभोरा येथील कार्यकर्त्यांनीही आता गाव व मतदारसंघाच्या विकासाकरिता बच्चू कडू यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वावर विश्वास ठेवत देउरवाड़ा येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रहारमध्ये प्रवेश केला आहे. प्रवेशाच्या कार्यक्रमाच्या वेळी प्रहारचे तालुकाध्यक्ष संतोष किटुकले, बाजार समितीचे सभापती राजेंद्र याऊल, दीपक भोगाडे उपस्थित होते.

# नाळ -२ फेम चयत्या ची अंबा रुक्मिणी महोत्सव कौडण्यपूर मध्ये हजेरी

## गाफील ची आकाशाकडे उंच भरारी; सिने अभिनेत्यांनी केला प्रेक्षकांसमोर चित्रपटातील अभिनय

## केसीआर चे जयकुमार बेलखेडे यांची उपस्थिती; कराओके गीत गायनातून महोत्सवाचा संगीतमय समारोप

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक कौडण्यपूर**

विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणार्या कौडण्यपूर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक अंबा रुख्मिणी महोत्सव २०२३ चा दिनांक ५ डिसेंबर रोजी सिने अभिनेत्यांच्या उपस्थितीत संगीतमय समारोप करण्यात आला. सर्वप्रथम सायंकाळी ५ वाजता राष्ट्रीय बाल कीर्तनकार शिवानंद पाल महाराज तायवाडे यांचे प्रबोधनात्मक कीर्तन संपन्न झाले. उपस्थित प्रेक्षकांनी यावेळी उस्फुर्त प्रतिसाद दिला. आपल्या प्रास्ताविकातून आयोजन समितीचे अक्षय पुंडेकर यांनी या दिमाखदार सोहळ्याच्या पार्श्वभूमीबद्दल माहिती दिली. व निमंत्रित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. आयोजकांच्या वतीने बालकीर्तनकार शिवानंद पाल महाराज तायवाडे, वडील गजानन तायवाडे व संच यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला. त्यानंतर सुप्रसिद्ध बाल कलाकार व सिने अभिनेता नाळ -२ चित्रपट फेम चयत्या म्हणजेच श्रीनिवास गणेश पोकळे याने ही महोत्सवाला हजेरी लावली. आई मला खेळायला जाऊ दे न व ! या प्रसिद्ध अभिनयातून त्याने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्याचबरोबर अंबा रुक्मिणी महोत्सव समितीद्वारे केलेल्या सन्मानाबद्दल आभार व्यक्त केले. उपस्थित चिमुकल्यांनी यावेळी चयत्या सोबत दिलखुलास संवाद साधला. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात लवकरच प्रदर्शित होणारा डॉ. मिलिंद ढोके दिग्दर्शित गाफील या मराठी चित्रपटाचे अभिनेता आदित्य राज व अभिनेत्री वैष्णवी बर्डे यांनीही महोत्सवाला हजेरी लावली. प्रेक्षकांच्या मनाला भुरळ घालणार्या अनोख्या शैलीतून त्यांनी व्यासपीठावर एन्ट्री केली. यावेळी व्यासपीठावर विशेष अतिथी म्हणून भारत राष्ट्र समितीचे वर्धा जिल्हा समन्वयक जयकुमार बेलखेडे व श्री राजीवकाका ठाकूर यांच्यासह गाफील चित्रपटाच्या को-प्रोड्युसर विजयाताई खुळे व वंदनाताई ढोके, तिवसा पंचायत समितीच्या मा. सभापती व सदस्य शिल्पाताई रविंद्रजी हांडे, तिवसा विधानसभा प्रहार पक्षाचे संजय देशमुख, श्री अंबिका देवी संस्थानचे अध्यक्ष ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज पातसे, शहीद भगतसिंग वाचनालय कुर्हा चे अध्यक्ष विवेक बिंड, श्री अंबिका देवस्थान चे पुजारी नरेंद्र महाराज पुरी, भैयासाहेब ठाकरे, गणेशराव पोकळे, तिवसा खरेदी विक्री संचालक रविंद्रजी हांडे, संजयराव महल्ले आदींची उपस्थिती होती.



विशेष म्हणजे सर्व मान्यवरांच्या हस्ते आकाश कंदील द्वारे अंबा रुख्मिणी महोत्सव व गाफील चित्रपटाचे पोस्टर आकाशात सोडल्या गेले. दूर आकाशात नयनरम्य असे अंबा रुख्मिणी महोत्सव व गाफील चे नाव दिसताच संपूर्ण प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात गाफील चित्रपटाच्या अभिनेत्यांचे स्वागत केले. अंबा रुख्मिणी महोत्सव समितीद्वारे अभिनेता आदित्य राज व अभिनेत्री वैष्णवी बर्डे यांचा सन्मानचिन्ह व देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर उपस्थित मान्यवरांचा सुद्धा आयोजकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी विशेष अतिथी म्हणून भारत राष्ट्र समितीचे वर्धा जिल्हा समन्वयक जयकुमार बेलखेडे यांनी आपल्या मनोगतामधून शुभेच्छा दिल्या व पुढील भव्य महोत्सवाकरिता नेहमी सोबत असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. तसेच श्री राजीवकाका ठाकूर यांनीही आपल्या मनोगतामधून आमदार ऍड. यशोमतीताई ठाकूर यांच्यातर्फे महोत्सवाला शुभेच्छा देत पुढील नियोजनासाठी नेहमी सोबत असल्याचे आश्वासन यावेळी दिले. तसेच प्रहार पक्षाचे मा. विदर्भ प्रमुख संजय देशमुख यांनीही कौंडण्यपूर यात्रेच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. शहीद भगतसिंग वाचनालय कुर्हा चे अध्यक्ष विवेक बिंड यांनीही महोत्सवाला शुभेच्छा देत नेहमी सोबत असल्याचे सांगितले. त्यानंतर कराओके गीत गायन गायन कार्यक्रमाच्या माध्यमातून महोत्सवाचा समारोप करण्यात आला. गायिका अंकिता आडे, गायक मैताब शाह, बाल कलाकार मुस्तफा शाह, श्रीकांत खंडारे यांनी एकाहून एक सुमधुर गीत गायन करून प्रेक्षकांकडून दाद मिळविली.

## अमरावतीचा पारा १४.३ अंश

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती शहरातीलतापमानाचा पारा रविवारी १४.३ डिग्री सेल्सिअस तर हवेतील आर्द्रता ८५ टक्के नोंद झाली. पुढील तीन दिवसांत तापमानात आणखी घट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे थंडीचा जोर वाढणार आहे. बंगालच्या उपसागरातून येणाऱ्या बाष्पाचे प्रमाण कमी झाल्याने तसेच उत्तरेकडील वारेवाहायला सुरुवात झाल्याने अमरावतीसह विदर्भात हळूहळू हुडहुडी भरवणाऱ्या थंडीचे प्रमाण वाढायला सुरुवात झाली आहे. रविवारी (ता.१०) शहरात ६ किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहत आहेत परिणामी जिल्ह्यात आता हळूहळू थंडीचे प्रमाण वाढायला सुरुवात झाली आहे. येत्या १६ डिसेंबरपर्यंत संपूर्ण विदर्भातील वातावरण सर्वसामान्यपणे कोरडे राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञ प्रा. अनिल बंड यांनी वर्तविली.

# कलश यात्रेचे नियोजन; महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## जिल्हा स्टेडियम येथून निघणार कलशयात्रा १६ ते २० डिसेंबर दरम्यान महापुराण कथा

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

येथील हनुमान चालिसा ट्रस्ट, आमदार रवी राणा, खासदार नवनीत राणा यांच्यावतीने उद्योजक चंद्रकुमार जाजोदिया यांच्या मार्गदर्शनात शुक्रवार, १५ डिसेंबर रोजी होणाऱ्या कलशयात्रेचे नियोजन व अंतिम तयारीसाठी रविवारी जिल्हा स्टेडियम येथे नियोजन सभेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल एक लाख महिलांच्या सहभागाने ही कलशयात्रा निघणार असून, या क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी महिलांनी प्रचंड गर्दी केली. या नियोजन बैठकीला पाच हजार महिलांची उपस्थिती होती, हे विशेष.कलशयात्रा १५ डिसेंबर रोजी जिल्हा स्टेडियम येथून दुपारी १२ वाजून ३० वाजता प्रारंभ होणार आहे. यात कथावाचक प्रदीप मिश्रा यांच्यासह संत, महंत, पाहुण्यांच्या उपस्थितीत ही कलशयात्रा इर्विन चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, राजापेठ उड्डाणपूल, कंवर नगर, फरशी स्टॉप, दस्तुरनगर चौक, छत्री तलाउमार्ग हनुमान गढी येथे जाणार आहे या कलशयात्रेच्या नियोजनासाठी आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्टेडियम येथे बैठक घेण्यात आली. कलशयात्रेत सहभागी होणाऱ्या महिलांना कलशयात्रेबाबत 'टॉप टू बॉटम' प्रारूप समजावून सांगण्यात आले. या बैठकीला सुनील राणा, अनुपमा राणा, जयंतराव वानखडे, प्रा. संजय तिरथकर, सुधा तिवारी, निशांत जोध, ज्योती सैरिसे, सुमती ढोके, सीमेश श्रॉफ, प्रा. राकेश बडगुजर, जितु दुधाने, विनोद जायलवाल, विनोद गुहे नितीन बोरकर आदींनी यावेळी आवश्यक त्या सूचना व नियोजनबाबत माहिती दिली. प्रत्येक गटप्रमुखाला जबाबदारी देण्यात आली.



### चांदुर बाजार शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद

चांदुर बाजार शहरात भव्य कलश यात्रेची नगरप्रदक्षिणा करण्यात आली या प्रसंगी हजारो महिलांसह तहसीलदार गीतांजली घरड या सुद्धा सहभागी झाल्या व पुढे यात्रा ही नागरप्रदक्षिणा करून नेरपिंगलाई करिता निघालीविविध चौकात भाविक भक्तांनी केले या रथयात्रेचे स्वागत,फटाक्यांच्या आतिषबाजीत झाले स्वागत,हर हर महादेव च्या गजरात शिवभक्तांच्या उत्साहाला उधाण आले होते.या रथयात्रेत समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लपी जाजोदिया पवन बैस , श्याम राठी , विनायकराव चर्जन सह शेकडो महिला उपस्थित होत्या.

# महिलांनी वात्सल्य व राष्ट्रप्रेमाचे अमृत प्राशन करावे

## विश्वमांगल्य सभेच्या सभाचार्या रेणुकामाईंचे आशीर्वचन : अमरावती जिल्हा नारीशक्ती संमेलन उत्साहात

**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्त्रीचे कुटुंबातील स्थान अत्यंत महत्वाचे असून तिने संसार संभाळतांना अष्टावधानी असावे. स्त्री घराबाहेर असली तरी तिची नजर घारीची असते. तिची नजर सदैव तिच्या घरावर, परिवारावर असते. कुटुंबातील कोणालाही नैराश्यातून बाहेर काढण्याची क्षमता स्त्रीमध्ये आहे. विचारांचे मंथन करताना आधुनिकतेचे जे विष आहे ते घरात आणू नये, तर वैचारिक मंथनातून वात्सल्य व राष्ट्रप्रेमाचे जे अमृत मिळते ते प्राशन करावे. भारत विश्वगुरु व्हावा यासाठी महिलांच्या सामर्थ्याचा उपयोग व्हावा. संघाचे कार्य अमुल्य असून त्यात स्त्रियांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे, असे आशीर्वचन विश्वमांगल्य सभेच्या सभाचार्या रेणुकामाई यांनी उद्घाटन सत्रात केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे २०२५ हे शताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्ताने विविध संघटनेतील महिलांनी एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी रविवार १० डिसेंबर रोजी सिपना इंजिनिअरिंग कॉलेजच्या सभागृहात अमरावती जिल्हा नारीशक्त संमेलन तीन सत्रात आयोजित केले होते. उद्घाटन सत्राच्या व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून म्हाडाच्या उपअभियंता दीपमाला बद्रे (साळुंखे) तर प्रमुख वक्ता म्हणून सन्मित्र सैनिकी विद्यालय, बल्लारशाच्या प्राचार्य अरुंधती कावडकर व संमेलनाच्या संयोजिका संगीता बुरंगे उपस्थित होत्या.



प्रमुख अतिथी दिपमाला बद्रे म्हणाल्या, महिलांनी आपली शक्ती ओळखावी व त्याचा उपयोग राष्ट्रकार्यासाठी करावा. प्रत्येक स्त्रीला संघर्ष करावा लागतो मात्र त्यातून मार्ग काढून स्वतःला सिद्ध करणे आवश्यक आहे. स्त्री शक्तीचा जागर समाजात घडून यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविकात संगीता बुरंगे यांनी महिला समन्वय हा मुख्य उद्देश असून विविध क्षेत्रात कार्य करणार्या महिलांचे एकत्रीकरण आणि महिलांच्या समस्यांचे निराकरण व त्यावर चर्चा करण्याचा उद्देश संमेलनाच्या पाठीमागचा असल्याचे त्यांनी सांगितले. पाहुण्यांचे स्वागत व परिचय शुभांगी केसाळे, अंजली देव, सुनीता बालेकर, आशा दाभाडे यांनी करून दिला. येसूबाई सावरकर हा एकपात्री प्रयोग रसिका वैष्णव यांनी सादर केला तर स्त्रीचे कुटुंबातील अस्तित्व काय या विषयावर रसिका वानखडे यांनी मांडणी केली. उपस्थितांचे आभार सहसंयोजिका रश्मी गांधी यांनी मानले.

महिलांच्या विविध सामाजिक प्रश्नांवर झालेल्या चर्चासत्रामध्ये स्त्री रोगतज्ज्ञ डॉ. मोनाली ढोले, विधिज्ञ सुषमा भट-जोशी, मनोविकार तज्ज्ञ डॉ. विद्युत खांदीवाले, आशासेविका आशा गायगोले यांनी सहभाग घेतला.संमेलनाला उपस्थित महिलांनी विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी उत्तरे दिली. या सत्राचे संचालन अनिता व्यवहारे, रश्मी नावंदर यांनी केले. समारोप सत्रानंतर संमेलनाची सांगता झाली. संमेलनाला जिल्ह्यातल्या विविध भागातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मेळघाटातील बहुतेक गावांत स्थलांतर,कुपोषणाचा प्रश्न कायम

## एप्रिल ते नोव्हेंबरमध्ये उपजिल्हा रुग्णालयात ४३ बालकांचा मृत्यू

**दि. ११ विदर्भ प्रजासत्ताक मेळघाट**

अमरावतीतल्या मेळघाटातील कुपोषण आणि बालमृत्यूचा दर दहा वर्षांच्या तुलनेत कमी आहे परंतू बालमृत्यू आणि कुपोषण अजूनही संपलेलं नाही. एबीपी माझाच्या टीमने तीन दिवस मेळघाटातील धारणी, चिखलदरा या भागातील अनेक गावांना भेटी दिल्या. समृद्धी महामार्गापासून १०० ते १२५ किमी असलेल्या मेळघाटातील अनेक गावात धड रस्ते नाहीत. जे रस्ते आहेत त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. आरोग्याच्या पायाभूत सुविधाही नाहीत. मेळघाटातील सर्वात मोठ्या धारणी परिसरात आजही कुपोषणाची प्रकरणं सर्वाधिक आहे. एप्रिलपासून नोव्हेंबर अखेरपर्यंत उप जिल्हा रुग्णालयात ४३ बालकांचा मृत्यू झाला आहे.



उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर म्हणाले, कुपोषणामुळे एकही बाळ दगावले नाही पाहिजे यासाठी आम्ही प्रयत्न करत असतो. कारण प्रत्येक आईसाठी बाळ महत्त्वाचे आहे. सध्याचा मृत्यू दर पाहिला तर सहा टक्के आहे. आमच्या रुग्णालयात उपचार शक्य नसेल तर आम्ही पालकांना त्यांना शहरात घेऊन जाण्याचा सल्ला देतो. मात्र पालक रुग्णलात घेऊन न जाता मुलांना घरी घेऊन जातात. मुलांना त्यामुळे वेळेवर उपचार मिळत नाही. रुग्णालयातील स्टाफ देखील कमी आहे. शासकीय रुग्णालयावर भार कमालीचा आहे. दरम्यान रोजगार मिळत नसल्याने मेळघाटातील बहुतेक गावांत ५० टक्क्यांहून अधिक घरांना टाळं लागलंय. तेथील लोक कामधंद्याच्या शोधात मध्य प्रदेश, गुजरातला विस्थापित झालेत. या स्थलांतरामुळे कुपोषणाचा प्रश्न कायम आहे. रोजगाराचा मोठा प्रश्न असल्याने स्थलांतर होत असल्याचे दिसून येत आहे. एकीकडी रोजगारासाठी सरकारने मनरेगा (महात्मा गांधी नॅशनल रूरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी ॲक्ट) ही योजना आणली. मात्र आजही रोजगारासाठी स्थलांतर होत असेल तर रोजगार हमी योजना फोल ठरल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

बालके अधिक प्रमाणात कुपोषित असून येथील परिस्थिती चिंताजनक आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडून कुपोषणमुक्तीसाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. मात्र आदिवासी समाजातील लोकांचे स्थलांतर तसेच परिस्थितीमुळे गरोदर महिलांना न मिळणारा सकस आहार, यामुळे जन्माला येणारे बाळ कुपोषित जन्मते. तर अनेक वेळा त्याचा मृत्यूही होतो. कुपोषण आणि बालमृत्यूच्या नावाने कोट्यवधी निधी येतो. मात्र तिथपर्यंत तो पोहोचत नाही तसेच त्याची जनजागृती होत नाही. या परिसरात कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे.

## आपण म्हणतो रेशनचा तांदूळ हलका, प्रत्यक्षात पोषणमूल्यांत असतो तगडा

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमातून गरजू, गरीब नागरिकांना धान्य पुरवठा केला जातो. मात्र, अनेक वेळा ते निकृष्ट दर्जाचे असल्याचे बोलले जाते. मात्र, आता हा शिक्का कायमस्वरूपी पुसला गेला आहे. महागड्या सुवासिक तांदळापेक्षाही अधिक पोषणमूल्य असलेला फोर्टीफाइड तांदूळ रेशन दुकानातून पुरविला जात आहे. आरोग्यासाठी उपयुक्त असल्याने या तांदळाची मागणी वाढली आहे. अनेक श्रीमंत नागरिकही या तांदळाला पसंती देत आहेत.मागील काही महिन्यांपासून शासनाने नागरिक, विद्यार्थ्यांचे मानसिक, शारीरिक आरोग्य तसेच रोगप्रतिकार शक्ती वाढीसाठी पोषण व सुरक्षित आहारांतर्गत सार्वजनिक वितरणामध्ये पोषण आहार देणे सुरू केले आहे. सहा प्रकारचे सूक्ष्म पोषणमूल्य असलेले तांदूळ तयार करून वितरण केले जात आहे.

## अमरावती मार्गावरील पूल कधी होणार? उरले केवळ ३ महिने

## काम झाले केवळ ५० टक्केचनागरिकांना ५ किमीपर्यंत त्रास

**दि११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती मार्गावर उड्डाणपुलाच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. मात्र, बांधकामाला आणि काही मंजुरी मिळण्यास विलंब होत असल्याने या ५ किलोमीटर अंतरावरून ये-जा करताना नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.



सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी संबंधित विभागांशी समन्वय का ठेवत नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. निर्धारित कालावधीनुसार पुढील तीन महिन्यांत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. मात्र, अजूनही जवळपास ५० टक्के काम शिल्लक आहे. सुमारे ५ किलोमीटर अंतराच्या या पुलाचे बांधकाम सुरू असलेल्या दोन उड्डाणपुलांच्या एकूण १०० स्पॅनपैकी आजवर फक्त ५३ स्पॅनचे काम पूर्ण झाले आहे. संथ बांधकाम चर्चेचा विषय आहे

अमरावती मार्गावर ब्लैक स्पॉट हटवून वाहतुकीला गती देण्याचे उद्देशाने हा प्रकल्प हाती घेण्यात आला. मात्र, आता हा संपूर्ण ५ किमीचा रस्ता 'ब्लॅक स्पॉट' बनला आहे. कामाला होणारा विलंब आणि काही बदलांमुळे प्रकल्पाची किंमत आता ४७८ कोटींवरून ४८५ कोटींवर गेली आहे. वाडी पोलिस स्टेशन ते नाका क्रमांक १० पर्यंत बांधण्यात येत असलेल्या पुलामध्ये एकूण ४८ पैकी ४५ स्पॅनचे काम पूर्ण झाले आहे. डी-टी-पॉइंट परिसरात १३२ केव्ही लाइनची उंची वाढवण्याच्या प्रस्तावाला अद्याप मंजुरी मिळालेली नाही यामुळे येथे ३ स्पॅन शिल्लक आहेत परिणामी येथे गर्डर लॉचिंग करत नाही या मार्गावर दिवसा गर्डर लॉचिंग शक्य नाही हे काम रात्रीच करावे लागते.

उड्डाणपुलाच्या दुसऱ्या भागात विद्यापीठ परिसर ते आरटीओ दरम्यानच्या सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामासाठी ७७ झाडांची छाटणी करण्यास परवानगी न मिळाल्याने काम संथगतीने सुरु आहे. या पुलाचे बांधकाम गतीने का होत नाही, संबंधित परवानग्या मिळण्यासाठी आणखी किती कालावधी लागणार, या पुलाचे बांधकामही पारडी पूल प्रकल्पाप्रमाणे रखडणार का, असे प्रश्न कायम आहेत.

## काँग्रेसचे खासदार धीरज साहूविरोधात भाजप आक्रमक,राजकमल चौकात पुतळा जाळून निषेध



**दि. ११ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

काँग्रेसचे राज्यसभा खासदार धीरज साहू यांच्या घरातून आयकर विभागाने तीनशे कोटींहून अधिकची रोकड जप्त केली आहे. याविरोधात भाजपने आक्रमक पवित्रा घेतला असून साहू यांच्यासोबत काँग्रेस नेत्यांविरोधात अमरावती सह जिल्ह्याभरात आंदोलन करण्यात आले राजकमल चौकात साहू यांचा पुतळा जाळून निषेध करण्यात आला.यावेळी जोरदार घोषणाबाजी हि करण्यात आली.

साहू यांच्याकडून इतक्या मोठ्या प्रमाणात काळा पैसा जप्त झाला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी हे 'मोहब्बत की दुकान' असल्याचे म्हणतात. प्रत्यक्षात काँग्रेस पक्ष हा 'भ्रष्ट मोहब्बत की दुकान' असल्याचा आरोप भाजप पदाधिकाऱ्यांनी लावला.या आंदोलनांमध्ये अनिता ताई राज, गंगा ताई खारकर , सुरेखाताई लुंगारे, लाविनाताई हर्षे, शीतलताई वाघमारे, सोनाली करेसिया, यांच्या सहभाजपच्या महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या.

## ओला कापूस वेचण्याचे शेतकऱ्यांना टेन्शन

## मजुरांची टंचाई : किलोमागे द्यावे लागते ९ ते १० रुपये

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीन, कापूस पिकाची लागवड केली जाते. यावर्षी अवकाळी पावसाने हातात आलेले पीक हिसकावले आहे. दरम्यान, शेतातील ओला झालेला कापूस वेचणीसाठी सध्या शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. वेचणीसाठी किलोमागे ९ ते १० रुपये मोजावे लागत असतानाही मजुरच मिळत नसल्याची स्थिती आहे. त्यातच कापसाला सध्या ६ हजार ८०० ते सात हजार रुपयांपर्यंत भाव आहे. त्यामुळे काय करावे, हा प्रश्न सध्या शेतकऱ्यांसमोर पडला आहे.



मागील आठवडाभरापासून जिल्ह्यात अवकाळीने शेतकऱ्यांची दाणादाण केली आहे. विशेषतः: खरीप हंगामाच्या सुरुवातीपासूनच कमी पावसामुळे पेरणी उशिरा करावी लागली. त्यानंतर मात्र आलेल्या पावसामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली होती. अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पुराचे पाणी शिरल्याने नुकसान झाले. यातून कसेबसे सावरत शेतकरी पुन्हा कामाला लागले. मात्र, अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे शेतातील वेचणीला आलेला कापूस पूर्णपणे भिजला. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. कापूस भिजल्याने वेचणी कशी करावी, कापसाला कसे वाळवावे आदी प्रश्न शेतकऱ्यांना सध्या पडला आहे.

**कापूस वाळविण्याचा केविलवाणा प्रयत्न**

ओला झालेला कापूस वेचणीसाठी अधिक पैसे मोजावे लागत असतानाही घरी आणलेला कापूस कसा वाळवायचा हा प्रश्नही शेतकऱ्यांना पडला आहे. काही शेतकरी अंगणात कापूस वाळवत आहे. मात्र, ढगाळी वाता- वरणामुळे घरी आणलेला कापूसही ओला होण्याची भिती आहे. दरम्यान, काहीजण पंखे लावून ओला कापूस कसा तरी वाळविण्याचा प्रयत्न करत आहेत

**उत्पादनासोबतच दरातही घसरण**

यंदा झालेला कमी पाऊस आणि विविध नैसर्गिक आपत्तींमुळे जवळपास सर्वच शेतमालाचे उत्पादन घटणार असल्याचे चित्र आहे. त्यामुळे शेतमालाच्या दरात तेजी येण्याची शक्यता आहे. मात्र सध्या स्थितीत जवळपास सर्वच शेतमालाच्या दरात सातत्याने घसरण होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची डोळ्यात पाणी आले आहे. पुढील दिवस कसे काढायचे, असा प्रश्न सध्या शेतकऱ्यांनी पडला आहे.

## नवजागरण मनिषी क्रांतिकारी स्मरण समितीचे राजकमल चौकात महानगरपालिकेच्या विरोधात राबविले हस्ताक्षर अभियान



**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती शहरातील राजकमल चौकात नवजागरण मनिषी क्रांतिकारी स्मरण समितीने अमरावती महानगरपालिकेने दिलेल्या वाढीव घर टॅक्स नोटीसच्या विरोधात सुरू केले हस्ताक्षर अभियान अमरावती महानगरपालिकेने मनमानी कारभार सुरू केला आहे अमरावती शहरात कुठल्याही सुख सुविधा नसताना राजेशाही पद्धतीने वाढ केली आहे अमरावती शहरातील नागरिकांनी दोन वर्षाच्या लॉक डाऊन चा सामना केला आहे ज्यामध्ये बहुतांश लोकांचे व्यवसाय उध्वस्त झालेले आहेत नोकरी घेतल्या आहेत पगारातही कपास झाली आहे तसेच बेरोजगारी आणि आकाशाला भिडलेल्या महागाईचे दर यामुळे जनतेचे कंबरडे मोडले आहेत ज्यावेळी नोकऱ्या नाहीत अतिरिक्त उत्पन्न नाही अशावेळी नोकऱ्या नाहीत अतिरिक्त उत्पन्न नाही आधीच बँक कंपन्यांचे कर्जाचे हप्ते भरणे कठीण होत आहे लोक अनन्यप्रकारे ग्रस्त आहेत आणि विविध प्रकारच्या कर्जात बुडलेले आहेत त्यांच्यासाठी जगणे देखील सोपे नाही अशावेळी आपल्या अमरावती महानगरपालिकेने दिलेला मालमत्ता परक अंदाधुंद वाढीव नोटीस म्हणजे अधिक व्यस्त झालेल्या जनतेच्या पाठीवर आणखी ओझे टाकण्यासारखे आहे या करवाडीचा सर्वसामान्य जनतेवर मोठा परिणाम होणार आहे.

## खारपान पट्ट्यातील महादेव कोळींना अनुसूचित जमातीचं जात प्रमाणपत्र द्या : ॲड. यशोमती ठाकूरांची विधानसभेत मागणी

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

विदर्भातल्या खारपान पट्ट्यातील अमरावती, भातकुली, दर्यापूर आणि अकोला जिल्ह्याच्या काही भागात मोठ्या प्रमाणावर महादेव कोळी समाज राहतो. या समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश आहे. मात्र, त्यांना अजूनही अनुसूचित जमातीचं जात प्रमाणपत्र मिळत नसल्याचा महत्त्वाचा प्रश्न अमरावतीच्या माजी पालकमंत्री तथा तिवसा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी विधानसभेत उपस्थित केला.विधीमंडळाच्या नागपूर हिवाळी अधिवेशनात ड. यशोमती ठाकूर यांनी विधासभेत महादेव कोळी समाजाच्या जात प्रमाणपत्राचा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करून सरकारसह सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. आदिवासी कोळी महादेव जात विकास संघ आणि वऱ्हाड-बेरार कोळी महादेव संघाच्या वतीने महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र मिळावे यासाठी आमरण उपोषण सुरू असल्याचे ड. यशोमती ठाकूर यांनी सभागृहाला सांगितले.१९५० मध्ये बेरार विभाग होता. मात्र, तेव्हाही महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र मिळाले नाही.



विदर्भातील खारपान पट्ट्यातील अमरावती, भातकुली, दर्यापूर आणि अकोला जिल्ह्यातील काही भागात महादेव कोळी समाज मोठ्या प्रमाणावर राहतो. महाराष्ट्रात इतर ठिकाणी महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीचे जात प्रमाणापत्र दिले जाते. मात्र, विदर्भातील खारपान पट्ट्यातील महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र दिले जात नाही. हा या समाजावर अन्याय असल्याचे ड. यशोमती ठाकूर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. याच खारपान पट्ट्यात टीएसपीचा निधी दिला जातो. मात्र, तिथल्या महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र दिले जात नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत सरपंच तसेच सदस्य पदाचे उमेदवार उभे करण्यास अडचणी येत असल्याचंही त्यांनी सभागृहाला सांगितले. अशा परिस्थितीत महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीचं जात प्रमाणपत्र तातडीने देण्यासाठी सरकारने तात्काळ पावलं उचलावीत, अशी आग्रही मागणीच ड. यशोमती ठाकूर यांनी विधानसभेत केली.

## पालखी मार्गासाठी पाच कोटी मंजूर तुषार भारतीय यांच्या प्रयत्नांना यश

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती मनपा क्षेत्रातील पालखी मार्ग काँक्रीटीकरणाकरीता ५ फेब्रुवारी २०१९ ला १० कोटी मंजूर झाले. त्यापैकी ५ कोटी मनपाला मिळाले. मात्र सरकार बदलल्यामुळे निधी अडकला. भाजपा नेते तुषार भारतीय यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून पालखी मार्गासाठी पाच कोटी रुपये मंजूर करण्यात आले. महायुती सरकार आल्यावर भाजपा नेते तुषार भारतीय यांनी महाराष्ट्राचे . उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊन निधीची मागणी केली. त्यावर शेरा देऊन प्रक्रिया सुरु झाली. १ डिसेंबर २०२३ ला राज्य शासनाने परिपत्रक काढून ५ कोटी मनपाला पाठविले आहे. या पालखी मार्गावर दोन पाईप पूल आहेत. लवकरच त्याचे काम करण्याची मागणी तुषार भारतीय यांची आहे. या मार्गांवर मनपातर्फे १० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. तुषार भारतीय यांनी आतापर्यंत बडनेरा मतदार संघातील विकास कामासाठी ५० कोटीची विकास कामे केलेली आहेत.



बडनेरा मतदार संघातील मनपा क्षेत्रात तसेच ग्रामीण भागात निधी उपलब्ध केला आहे.